गणपती बाप्पा मोरया...


आधुनिक केसरी

MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 31 AUGUST 2022

adhunikkesari.com Adhunik Kesari




# सार्वजनिक गणेशोत्सवाच्या चढाओढीला लगाम घालण्याची गरज

## चिंतन गणेशोत्सवाचे: आधुनिक केसरीकडे सर्वसामान्यांच्या प्रतिक्रिया

### सार्वजनिक गणेशोत्सव धमाल समजू नये



सार्वजनिक गणेशोत्सव म्हणजे नुसती धमाल नाही. देवाने एक सुंदर कालावधी दिलाय आपल्या विभागातील सर्वांना एकत्र येण्याचा. चांगल्या विचारांचे मंथन व्हावे. आपल्या हातून विधायक काम अथवा समाजकार्य घडावे. सामाजिक बांधिलकी जपली जावी. आपल्या विभागातील अबालवृद्ध कसे आनंदी आणि सुरक्षित राहतील याचा विचार व्हावा आणि मनोरंजन करता करता कलाकार सुद्धा जपला जावा ही अपेक्षा.

विजय चव्हाण
प्रसिद्ध ढोलकीवादक आणि तालसम्राट मुंबई.

### जमलेला लोकनिधी गरजूपर्यंत पोहोचवा



गणेश उत्सवाचा प्रारंभ हाच मुळी समाज प्रबोधन ही संकल्पना डोळ्यासमोर ठेवून लोकमान्य टिळक यांनी केला. मागील दोन वर्षांमध्ये कोविडच्या कालावधीमध्ये आपण या सार्वजनिक गणेशोत्सवापासून वंचित राहिलो परंतु यावर्षी आपल्याला पुन्हा एकत्र येण्यासाठी संधी मिळाली आहे तर उपलब्ध झालेल्या लोकनिधीचा उपयोग नक्कीच सार्वजनिक गणेश मंडळांनी लोक प्रबोधन, गरजू विद्यार्थ्यांना मदत, गरजू स्त्रियांना लघु उद्योगासाठी भांडवल पुरवणे असे सामाजिक उपक्रम राबवले तर नक्कीच यावर्षीचा गणेशोत्सव हा चांगल्या प्रकारे साजरा करता येईल.

डॉ.दिपाली उमाळे
पाठयनिर्देशिका तथा लेखिका, मुंबई.

आधुनिक केसरी

गणेश उत्सवास आजपासूनच सुरवात होत आहे. कोविड महामारीनंतर यावर्षी सर्वत्र जल्लोष पाहायला मिळत आहे. असे असले तरी सार्वजनिक गणेश उत्सवातील आवाज, गर्दी, पैशाचा अपव्यय थांबविणे गणेशोत्सव मंडळाच्या हातात आहे. पण काही मंडळाकडे बघून कोविडच्या दोन वर्षाची राहिलेली कसर भरून काढण्याच्या ईर्षावृत्तीला लगाम कोण घालणार? हा प्रश्न आहे. याच अनुषंगाने महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील सर्वसामान्य आणि संवेदनशील नागरिकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या चढाओढीला लगाम घालण्याची गरज आधुनिक केसरीजवळ व्यक्त केली.




### अनाठायी खर्च टाळा



गणेश भक्तांना माझी एक नम्र विनंती आहे जरूर आपला सण आणि उत्सव साजरे केले पाहिजेत. परंतु अनाठायी पैसा खर्च न करता पैशाची बचत करणं आता फार गरजेचे आहे. सध्या महागाईने डोके वर काढलेले आहे. दोन वर्षे कोरोणामुळे आपण खूप हालकीचे काढलेले आहेत. माझ्या राज्यातील लोककलावंत, गोरगरीब, शेतमजूर, शेतकरी यांनी खूप खूप हाल अपेक्षा सोसल्या आहेत त्याचा विचार आपण तरुणांनी करावा आणि गणेशोत्सव कमी खर्चामध्ये करावा. अपंग, मूकबधिर, अंध विद्यार्थ्यांना मदत करून आपल्या विचाराचे समाजाला दर्शन द्यावे. आणि त्यांच्या जीवनामध्ये नवसंजीवनी आणावी.

संभाजी राजे जाधव
अध्यक्ष लोककलावंत मराठी तमाशा परिषद महाराष्ट्र राज्य

### टिळकांची संकल्पना जपली जावी



सार्वजनिक गणेश उत्सव हा लोकमान्य टिळकांच्या संकल्पने नुसार साजरा केला जावा. जनजागृती, धर्म महत्ता आणि मनोरंजन यांचा स्तर सांभाळून कार्यक्रमांची आखणी केली जावी. गणेशमूर्तींचे विसर्जन करताना पावित्र्य जपले जावे. नंतर बऱ्याच वेळा मूर्तींचे अवशेष, अवयव पायदळी येतात. ते टाळण्यासाठी सार्वजनिक हौदांमध्येच विसर्जन केले जावे आणि नगरपालिका, महापालिका यांनी सर्व गणपती पूर्ण विरघळल्याची खात्री करून घ्यावी. तरच उत्सवाचे पावित्र्य कायम राहील.


प्रकाश महागांवकर
लेखक, पुणे

### उत्सवात साधेपणाची कास धरावी



गणेश उत्सवाचे स्वरूप हे उत्साही असावे. समाजप्रबोधन करण्यासाठी हे मोठं प्रभावी साधन आहे. परंतु आता गणेश उत्सवाला स्वरूप हे हिडीस होत चालले आहे. नको ती गाणी, जुगार यावर तसेच तुझ मंडळ मोठं की माझ मोठं यापेक्षा मंडळांनी ही इर्षा व मोह थांबवली पाहिजे. कोरोनाने दोन वर्षे जग आर्थिक मंदीत सापडले आहे.अजूनही जनता या आर्थिक संकटातून वर आलेली नाही. या वर्षी वरदविनायकच गणेश मंडळांना सद्बुद्धी देवो व साधेपणाने व पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा होवो. हीच अपेक्षा.

राजेंद्र फंड
उपसंपादक, ग्रामसेवा संदेश दिवाळी अंक राहाता.



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## जहाँ डाल डाल पर...

आधुनिक केसरी

धातुशास्त्र, स्थापत्यकला यासोबतच नृत्यकला, नाट्यकला, शिल्पकला भारतात विकसित झाली होती. भरतमुनींचा ' नाट्यशास्त्र ' ग्रंथ याची साक्ष देतो. भारतीय नृत्य, नाट्य आणि संगीतकलेची मुळे या ग्रंथात आपल्याला आढळतात. छंदशास्त्र , व्याकरणशास्त्र, गणितशास्त्र, खगोलशास्त्र, ज्योतिषशास्त्र इ अनेक विषयांवर संस्कृत भाषेत प्राचीन भारतात ग्रंथ निर्मिती झालेली होती. भारतातील नालंदा, तक्षशिला यासारख्या विद्यापीठात अनेक देशातून विद्यार्थी शिकण्यासाठी येत होते. रेशीम, मसाल्याचे पदार्थ, हिरे, माणके, मोती आदी रत्ने या सगळ्यांच्या व्यापारासाठी भारत प्रसिद्ध होता. वास्को द गामा समुद्रमार्गे भारतात आला आणि भारतातील मसाल्याचा मोठा व्यापार हाती लागल्याचा आनंद त्याला झाला. पोर्तुगीज व्यापाऱ्यांनी भारताशी व्यापार करून मसाल्याच्या पदार्थातून अफाट नफा कमावला. भारतावर शक, कुशाण, हूण, मुघल,डच, फ्रेंच,पोर्तुगीज, इंग्रज अनेक आक्रमक आले. त्यातील मुघल आणि इंग्रजांनी प्रदीर्घ काळ भारतावर राज्य केले. इंग्रजांनी भारतातील प्रचंड साधनसंपत्तीची लूट केली. भारतातून कच्चा माल इंग्लंडला नेऊन तेथील कारखान्यात तयार झालेल्या मालाची हक्काची बाजारपेठ भारताला बनवून भारतातील उद्योगधंदे उध्वस्त केले. सातत्याने परकीय आक्रमणे झाली तरी भारताची संस्कृती आणि त्यातील एकता, अखंडता, सहिष्णुता टिकून राहिली. याला कारण म्हणजे भारताची सर्वसमावेश करण्याची उदार मानसिकता. इथे जो जो आला, त्याला आम्ही आपला मानला. तो या संस्कृतीत सामावून गेला.

प्राचीन भारताने जगाला अनेक देणग्या दिल्या आहेत त्यातील तीन प्रमुख आहेत असे मला वाटते. त्यातील पहिली म्हणजे योगशास्त्र. पतंजली मुनींनी लिहिलेली ' योगसूत्रे ' आजही जगाला मार्गदर्शन करीत आहेत. त्याआधारे योगगुरू बी के एस अय्यंगार, बाबा रामदेव, श्री श्री रविशंकर आणि इतर अनेक योगाचार्यांनी आधुनिक भारताला आणि जगालाही निरामय आरोग्याची साधना शिकवली आहे. योगासने, प्राणायाम यांचे पुनरुज्जीवन केले आहे. दुसरी देणगी आहे ' आयुर्वेद'. चरक, सुश्रुत आदी आयुर्वेदाचार्यांनी त्या काळात जे मार्गदर्शन केले, ग्रंथ लिहून ठेवले त्याआधारे आज भारतातील आयुर्वेद प्रगती करीत आहे. आयुर्वेद केवळ शरीराचा विचार न करता मनाचाही विचार करतो. विविध वृक्ष, वनस्पती, फळे, फुले आदींबाबत निरीक्षण आणि प्रयोग करून प्राचीन आयुर्वेदाचार्यांनी आपल्यासमोर जे ज्ञान ठेवले आहे,त्याची महती अवर्णनीय आहे. **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

## नमस्काराचे महत्त्व

आधुनिक केसरी

प्रत्येक प्रांतात नमस्काराची पद्धत निराळी असते; परंतू हेतू मात्र बहुतांशी सारखाच आणि एकच असतो, तो म्हणजे आपल्या अंतर्मनातील आदरभाव व्यक्त करणे होय. ज्याठिकाणी आपण आदर व्यक्त करतो त्याचठिकाणी आपण नमस्कार करतो, काहीवेळा तर नतमस्तक देखील होतो. जेव्हा आदर दिला जातो, तेव्हाच तो आपल्याला मिळायलाही लागतो, हे आपण अनुभवत असतो. आपल्या प्रत्येक क्रियेला प्रतिक्रिया असते, जशी क्रिया तशी प्रतिक्रिया. म्हणूनच आपल्या नमस्काराच्या क्रियेला नमस्काराचीच प्रतिक्रिया मिळते. नमस्काराचे महत्व समजून घेण्याची जाणीव होणे आवश्यक असते. दुसऱ्याला नमस्कार करण्याने आपले अवगुण कमी होतात. मोठी चूक घडली तरी नमस्काराने क्षमा होऊ शकते. मी शरण आलो आहे, हे समोरच्याला सांगण्यासाठी फक्त एक नमस्कार पुरतो. यथायोग्य व्यक्ती समोर मान झुकवायला लाज कशाला बाळगायची? ज्याच्या समोर मान झुकवली, त्यालाच त्या मानेच्या रक्षणाची जबाबदारी येते. म्हणून नमस्कारामध्ये मोठे सामर्थ्य दडलेले असते.


विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपला नव्याने झालेला परिचय धृढ व्हावा, निर्माण झालेले नाते वृद्धिंगत व्हावे ह्या दृष्टीकोनातून देखील ह्या नमस्काराचे महत्व आपण अनुभवत असतो. नमस्कार कोणाला, का, कधी आणि कसा करावा ह्याच्या संबंधी काही पारंपारिक रिवाज आहेत. अर्थातच वयाने, मानाने, विचारांनी, व्यवसायाने, शिक्षणाने आणि अनुभवाने जेष्ठ व्यक्तीला नमस्कार करण्याची रीत आपापल्या संस्कृतीप्रमाणे प्रचलित आहे. ह्या नमस्काराने शुभाशिर्वाद मिळतात असे समजण्याचा प्रघात आहे. नमस्कारात प्रेम आणि विनय प्राप्त होतो, तो अनुशासन, आदर शिकवतो, मनात सुविचार येतात, क्रोध नष्ट होत जातो, अहंकार नष्ट होतो, शीतलता येते, नमस्कार दुःखाचे अश्रू पुसण्याचे काम करतो आणि आपल्या संस्कृतीचे दर्शन घडवतो.



आधुनिक केसरी

## मूर्ती वात्सल्याची ।प्रगटली ।।

**वात्सल्याचा पान्हा | आनंदाचे घर ||**
**जीवनाचे सार | प्रेमरस ||१||**

**प्रेमावीन जीणे | वांझोटे बोथट ||**
**काय होलपट | कामा येते? ||२||**

**असोनी कुबेर | प्रेमाचा भिकारी ||**
**हिंडे दारोदारी | पिशाच्च ते ||३||**

**संत उपदेश | प्रेमामृत जाण ||**
**कर सोडवण | वेड्या जीवा ||४||**

**वात्सल्याचे देणे | ईश्वरी प्रसाद ||**
**नसावा उन्माद | माझ्या मना ||५||**

**धन्य ज्ञानेश्वर | माऊली विश्वाची ||**
**मूर्ती वात्सल्याची | प्रगटली ||६||**


प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## श्रीगणेशवन्दनम् ।

**ह.भ.प. डॉ. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर विरचित श्रीगणेशवंदन आजच्या भाद्रपद शुद्ध चतुर्थी म्हणजेच श्रीगणेश चतुर्थीच्या मंगल प्रसंगी खास दै. आधुनिक केसरीच्या वाचकांसाठी प्रकाशित करताना आम्हाला आध्यात्मिक आनंदाची अनुभूती होत आहे.**

**- संपादक**

आधुनिक केसरी

श्रीगणेशो वरं दाता विघ्नहर्ता स्वभावतः।
पार्वतीश्वरयोः पुत्रः पातु मां सर्वतोपरि।। १।।
वर देणाऱ्या, स्वभावाने विघ्न हरण करणाऱ्या, शिवपार्वतीपुत्र अशा श्रीगणेशाने माझे सर्वतोपरी रक्षण करावे.
खलनिर्दालकः साक्षान्महादेवसुतः प्रभुः।
इत ऋद्धिस्ततः सिद्धिर्राजते गणेश्वरः।। २।।
साक्षात् महादेवसुत प्रभु दुष्टांचे निर्दालन करणारा आहे. एकीकडे ऋद्धि व एकीकडे सिद्धि असणारा गणेश्वर शोभून दिसतो.
मेधानामीश्वरस्यास्य त्वोङ्कारररूपमद्वयम्।
विद्यां ददाति सर्वेभ्यः स जयति महेशजः।।३।।
बुद्धीचे दैवत असणाऱ्या या देवाचे ओंकाररूप अद्वय आहे. सर्वांना विद्या देणारा तो महेशपुत्र विजयी होतो.
कुमारस्यानुजोऽयं हि शोभते मूषकोपरि।
यश्च वाञ्छति यद्यद्धि तस्मै यच्छति सर्वदः।।४।।
कार्तिकेयाचा हा लहान भाऊ मूषकावर शोभून दिसतो. जो जे जे मागतो त्याला सर्व काही देणारा हा गणेश, ते ते देतो.
अकारणं दयालुत्वं कृपालुत्वं स्वभावजम्।
परमपूजनीयोऽयं पातु नः सर्वतोपरि।।५।।
अकारण दयालुत्व आणि स्वाभाविक कृपालुत्व असणारा हा परमपूजनीय गणेश आमचे सर्वतोपरी रक्षण करो.


डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

अगाधमहिमाऽस्यास्ति वर्णये किमहं कथम्।
गायन्ति यत्र सर्वे हि द्युलोकस्थाः स्तवं शुभम्।।६।।
याचा महिमा अगाध आहे. तो मी काय आणि कसा वर्णन करू; की, जेथे सर्व देव त्याची शुभ स्तवनं गातात.
स्तुत्त्वा नत्त्वा जना यान्ति कुशलतां प्रवीणताम्।
मोरया मोरया घोषं कृत्त्वा धन्या भवन्ति ते।।७।।
त्याची स्तुती करून, त्याला नमस्कार करून लोक कुशलतेला, प्रवीणतेला प्राप्त होतात. ''मोरया, मोरया'' असा घोष करून ते धन्य होतात.
मुनीनां वचनं सत्यं कलौ चण्डिविनायकौ।
हासो नमति तं देवं सर्वविघ्नोपशान्तये।।८।।
मुनींचे वचन सत्यच आहे की, कलियुगात चण्डीमाता व विनायकाची भक्ती करावी. सर्वविघ्नांच्या उपशमनासाठी चन्द्रहास त्या गणपती देवाला नमस्कार करतो.

# मंगलमयतेची अनुभूती देणारी श्री सत्यनारायण महापूजा

आधुनिक केसरी न्यूज

महादेव बी. बुरुटे
मो. 9765374805

दोन्ही हातांनी खांद्यावरली खुटं अलगद नेऊन माळीच्या आत कोपऱ्यात ठेऊन बाहेर येऊन दारातल्या लाकडी बाजल्यावर (मांड म्हणायचो आम्ही त्याला) बसत. तोंडावरचे हसू आणि समाधान तसूभरही कमी होत नसायचे. शक्यतो फिकट गुलाबी किंवा पांढरा पटका, जाड धोतर, अंगात मांजरपाट कापडी बंडी, कधीतरी तीन बटणी पांढरट किंवा आकाशी अंगरखा हा त्याचा नेहमीचा पेहराव! तेवढ्यात घरातून पाण्याचा तांब्या समोर आलेला असायचा. घटाघटा पाणी पिऊस्तवर आजोबा हात पाय धुवून शेजारी येऊन बसत, "बेस काम केलंच बग भिवा" म्हणायचे. "व्हय गा दादा. सकाळीच माळ्याच्या मळ्यात जाऊन घिवून आलू. जनावरांना वैरण पाणी बघून निगून आलू.."........
वडिलांनी सकाळीच गावात जाऊन लक्ष्मण खडतरेंच्या घरातून सत्यनारायण कथेची पोथी आणून ठेवलेली असायची. दुपारी एक दिडच्या दरम्यान तयारी सुरु व्हायची. बाहेर दगडांची चूल करून त्यावर हंडा ठेवून पाणी ओतून जाळ लावला जायचा. या साऱ्यात तीन वाजून गेलेले असायचे. हंडयातील पाण्यास उकळी फुटलेली असायची. मग आई किंवा आजी घरात पाण्याने ओलावून ठेवलेली खीर त्या उकळत्या पाण्याचा व भरडलेल्या खिरीचा अंदाज घेऊन



वैरायची. गाठी होऊ नयेत म्हणून लाकडी डावेने ढवळत रहायचे. खीर शिजेल तशी घट्ट होत जायची. मग त्यात ओल्या खोबऱ्याचा खिस, वेलदोडे वगैरे आणि गूळ घालून कमी जाळावर शिजत ठेवली जाई. पूर्ण शिजल्यावर नुसत्याच आरावर ठेवली जाई. मधूर सुवासिक खीर जराशी पातळ असतानाच हंड्याच्या गळ्याला कासरा बांधून दोघे तिघे तो कासरा धरून हंडा उतरुन ठेवत. हे होईस्तोवर कडूसं होत आलेलं असायचं. दरम्यान इकडे हा खीर करण्याचा सोहळा सुरू असतानाच घरात नैवेद्यासाठी पोळ्या, प्रसादासाठी शिरा तयार झालेला असायचा. तुम्ही इतर वेळी कितीही प्रयत्न करुन शिरा केला तरी या प्रसादाच्या शिऱ्याची सर त्याला येत नाही. या प्रसादाची रुची व पावित्र्य एक वेगळेच असते हे त्याचे न उलगडणारे वैशिष्ट्य आहे. या दरम्यानच वडील किंवा घरातील कुणीतरी मोठे घरात असलेली सागवानी लाकडाची चौक पेटी घेऊन ती स्वच्छ करून घरात सारवलेल्या जमीनीवर ठेवून तीच्यावर पूजा मांडली जाई. वर पांढरे मलमली सुती कापड किंवा ब्लाउज पीस पसरुन चारी बाजूंनी केळीची पाच खुटे उभी करून बांधली जात. वरील कपड्यावर विशिष्ट पद्धतीने तांदूळ पसरुन मधोमध तांब्याचा तांब्या पाणी भरुन त्यावर वरील बाजूस विड्याची पाने व त्यावर नारळ ठेवून ठेवला जाई. त्याच्या गळ्यात सोन्याचा दागिना घातला जाई. चारी बाजूंनी व मधे खारीक, खोबरे, हळकुंड, केळी तसेच उपलब्ध फळापैकी एकेक फळ, रांगणारा पितळेचा छोटा बाळकृष्ण ठेवून बुक्का लावला जाई. समोर एक पोते अंथरुण त्यावर पेटीला (चौरंगाला) टेकून देवाच्या मुर्ती लावल्या जात. समोर पंचारतीचे ताट, त्यात आगरबत्त्या, बुक्का, इभतीचा माला वगैरे वस्तू, दुसर्या एका ताटात फुले, फळे, पाने वगैरे व आणखी एका ताटात नैवेद्य ठेवलेला असे. आरत्यांमध्ये गोडे तेल, वाती घेऊन आरत्या, आगरबत्त्या लावल्या जात. सुगंधी परिमळाच्या दरवळाने पवित्र वातावरणात आणखीनच भर पडे. पोथी वाचण्याचा कार्यक्रम सुरू होइ. आम्ही घरचेच कोणीतरी किंवा पोथीमालक खडतरे, कधी जमलेल्यांपैकी एखादा पोथी वाचत असे. आई व आण्णा नवीन किंवा ठेवणीतले कपडे घालून पुजेस बसत. पुजेला सांगितलेल्यापैकी जमलेले लोक पोथी ऐकण्यास येऊन भक्तिभावाने बसत. प्रत्येकाला कपाळावर बुक्का, इभत लावली जाइ. अध्याय वाचणे सुरू होइ. प्रत्येक अध्याय संपला की 'बोलाऽऽ.. पुंडलिका, वरदे हरी विठ्ठऽऽल.. श्री ज्ञानदेव, तुकाऽऽराम.... पंढरीनाथ महाराऽऽज की जय| सत्यनारायण महाराऽऽज की जय... ||' असा घोष करीत फुले वाहीली जात. कापूर पेटवला जाइ. असेच पाच अध्याय संपले की मग सर्वजण उभे राहत. सर्वांच्या हातात फुले दिली जात. व आरती केली जाइ. वडील-
'घालीन लोटांगण, वंदीन चरण
डोळ्यांनी पाहीन, रुप तुझे..'

**(उर्वरित उद्याच्या अंकात)**

बुधवार, 31 ऑगस्ट 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 33
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

॥ आधि वंद तुज मोरया ॥
गणपती बाप्पा मोरया...

●MARATHI ●DAINIK ●AURANGABAD (MAHARASHTRA) ●WEDNESDAY 31 AUGUST 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-33 ●TITLE CODE : MAHMAR51117 ●PAGE-12 ●PRICE-5

# गुजरात दंगलीतील 8 खटले बंद

## 'या' प्रकरणाची सुनावणी सुरू राहणार : सर्वोच्च न्यायालय

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : गुजरातमध्ये 2002 साली झालेल्या दंगलीशी संबंधित 9 पैकी 8 खटले बंद करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. या सर्व प्रकरणांशी संबंधित अनेक याचिका सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित होत्या. सरन्यायाधीश यूयू ललित यांच्या नेतृत्वाखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने मंगळवारी सांगितले की, इतका वेळ निघून गेल्यानंतर आता या प्रकरणांवर सुनावणी करण्यात काही अर्थ नाही. दरम्यान, अन्य एका प्रकरणात न्यायालयाने कार्यकर्त्या तीस्ता सेटलवाड यांना दिलासा मिळावा म्हणून अपील करण्याची परवानगी दिली.**

सुप्रीम कोर्टाने सांगितले की, गुजरात दंगलीशी संबंधित 9 पैकी 8 प्रकरणांमध्ये कनिष्ठ न्यायालयांनी निकाल दिला आहे. दंगलीदरम्यान झालेल्या हिंसाचाराच्या चौकशीची मागणी करणाऱ्या राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या म्हणजेच NHRCच्या याचिकेचा यात समावेश आहे. न्यायालयाने दंगलग्रस्तांच्या रिट याचिका आणि सिटीझन्स फॉर जस्टिस नावाच्या एनजीओचाही विचार केला. 2003-2004 मध्ये दाखल केलेल्या याचिकेत एनजीओने गुजरात पोलिसांकडून दंगलीचा तपास सीबीआयकडे सोपवण्याची मागणी केली होती.

**9 पैकी 8 खटल्यांची सुनावणी पूर्ण**

सरन्यायाधीश यूयू ललित यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने सर्वोच्च न्यायालयात हा निकाल दिला. या खंडपीठात न्यायमूर्ती रवींद्र भट आणि न्यायमूर्ती जेबी परडीवाला यांचा समावेश आहे. खंडपीठाने सांगितले की, गुजरात दंगलीशी संबंधित 9 प्रकरणांची चौकशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच एसआयटी स्थापन केली आहे. त्यापैकी 8 प्रकरणांची सुनावणी पूर्ण झाली आहे. नरोडा गावाशी संबंधित खटल्याची सुनावणी अद्याप सुरू आहे. खंडपीठाने सांगितले की, पीडित कुटुंबांच्या वकीलांनीही एसआयटीच्या वक्तव्याशी सहमती दर्शवली आहे. त्यामुळे सर्व प्रकरणांना काही अर्थ नाही. त्यामुळे या याचिकांवर अधिक विचार करण्याची गरज नाही, असे न्यायालयाचे मत आहे.



### नरोडा प्रकरणात एसआयटी कायदेशीर पावले उचलू शकते

एसआयटीचे वकील मुकुल रोहतगी यांनी न्यायालयाला सांगितले की, नऊ प्रकरणांपैकी फक्त नरोडा गावातील हिंसाचाराचे प्रकरण प्रलंबित आहे आणि त्यातही अंतिम युक्तिवाद प्रलंबित आहेत. उर्वरित 8 प्रकरणांची सुनावणी पूर्ण झाली असून ती उच्च न्यायालयात किंवा सर्वोच्च न्यायालयात अपीलाच्या टप्प्यात आहेत. त्यावर न्यायालयाने सांगितले की, नरोडा गाव प्रकरणाची सुनावणी कायद्यानुसार सुरू राहील. सर्वोच्च न्यायालयाने स्थापन केलेली एसआयटी कायद्यानुसार या प्रकरणात आवश्यक पावले उचलू शकते.

## विशेष

# गणेशोत्सव साजरा करताना...

आधुनिक केसरी

दिनांक 31 ऑगस्टपासून गणेशोत्सव साजरा करायचा आहे. आज सार्वजनिक गणपती मंडळे, जबरदस्ती वारेमाप वर्गणी गोळा करतात. आणि बरेच कार्यकर्ते केवळ मौजमजेसाठी आणि व्यसनांची हौस पुरवून घेण्यासाठी क्रियाशील असतात. हे कटू सत्य आहे. तसेच गणेश मंडळे हे राजकीय क्षेत्रातील प्रवेशद्वार झाले आहेत. जनतेच्या आणि वर्गणीदारांचे पैशावर प्रसिद्धी लोलूप नेते बनतात. हे बंद झाले पाहीजे. वारेमाप खर्च आणि बाजारू स्वरूप आणू नये.

सार्वजनिक गणेशोत्सवाचे जनक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक याची जी संकल्पना होती हा उत्सव साजरा करण्याचे सुरू करण्या मागील ती कांही अंशी तरी जपावी. डीजे मोठमोठ्या आवाजात लावून बिभत्स गाणी लावणे, मिरवणूकांमध्ये धांगडधिंगा करत चित्रविचित्र हावभाव करणे थांबवावे. सिनेमातील वाईट गाणी लावू नयेत. पावित्र्य जपावे. जेंव्हा हिंदू समाजच सणासुदीला देवदेवतांचे अपेक्षीत पावित्र्य, समाज प्रबोधन, गुंडाळून ठेवून बाजारू स्वरूप आणतात तेंव्हा हिंदू देवदेवतांची विटंबना करू धजावणाऱ्या समाज कंटकांना, हिंदू विरोधी जनमताला कसा आवर घालणार. आज चमत्काराशिवाय नमस्कार नाही अशी वृत्ती वाढत आहे. आणि म्हणूनच मागची अनुभवी, वयस्क पिढी पुढच्या पिढीला कांहीच शिकवू शकत नाही.

रुढी परंपरा अंधविश्वासाने पाळायच्या आणि सण साजरे करण्याचे सोपस्कार पूर्ण करायचे एवढेच आजच्या पिढीला Stand आहे. घरोघर आपण गणपती बसवतो. कोणी दिड दिवसाचा, कोणी तीन दिवसांचा, कोणी पाच दिवसांचा, गौरी सोबत विसर्जीत करतात, कोणी सात दिवस, कोणी नऊ दिवस तर आमचे सारखे असंख्य लोक पूर्ण दहा दिवस उत्सव साजरा करतात.

पुण्या, मुंबईतले गणपती पाहण्यासारखे, भव्यदिव्य असतात, विसर्जन मिरवणुका ऐतिहासिक आणि वैशिष्ट्य पूर्ण असतात, त्या पाहता याव्यात म्हणून पिंपरी चिंचवड शहर, जिल्हा सात आणि नऊ दिवसाचे बसवतात. म्हणजे त्यात शास्त्र काहीच नाही, आपली सोय फक्त पाहणे आहे. जी कष्टकरी मंडळी हा उत्सव जोरदारपणे, शिस्तबद्ध आणि विनादंगल पार पाडण्यासाठी घरची पूजा अर्चा सोडून केवळ कर्तव्य आणि ड्युटी पार पाडण्यासाठी झटतात. त्यांचे हाताने दहा दिवसातल्या आरत्या कराव्यात म्हणजे मंडप बांधणी, आरास, सजावट, देखावे तयार करतात, जे पोलीस दलाचे कर्मचारी जे दिवसरात्र गणपती जवळ मंडपात तैनात असतात त्यांना आरतीचा मान द्यावा.

अकारण मोठे उद्योगपती, मोठे डोनर्स, नेते, वेगवेगळ्या समित्यांचे अध्यक्ष, कार्यवाह यांचे हस्ते आरत्या करून पैसे उकळण्या पेक्षा या कर्तव्यदक्ष, कष्टकऱ्यांच्या हस्ते पूजा आरती करणे कधीही पूण्याचे काम ठरेल. तसेच आपले घरी गणपती बसवलेला असूनही ड्युटीवर असल्याने त्यांना आरतीचा आनंद घेता येत नाही त्यांना तो मिळेल. समाजाभिमुख कार्यक्रम, उपक्रम, मार्गदर्शक, अनुकरणीय कार्यक्रम आयोजित करावेत. आरास, देखावे, चल, हलते मुर्त्यांचे देखावे जरूर करावेत. फक्त असहनिय आवाजातील, अधार्मिक, गाणे लावणे, नाचणे थांबवावे. आपणच आपला धर्म निट आणि अत्यंत भावनिक पध्दतीने साजरा व्हावा. म्हणजे फिल्म इंडस्ट्री, बॉलिवूड जे देवदेवतांचा उपमर्द करू धजावतात ते बंद होईल. कोणताही हिंदू विरोधी राजकीय पक्ष प्रभु श्रीराम हे काल्पनिक पात्र असून रामायण ही कादंबरी असल्याचे प्रतिज्ञापत्र देवू शकते. हिंदू धर्मात असंख्य जाती पाती आहेत, तशाच मुस्लिमांमध्ये, ख्रिस्ती धर्मीयांमध्ये ही आहेत. परंतू त्यांचा आल्ला आणि येसू एकच आहे. आपल्या सारखे तेहतीस कोटी देव आणि एकशे पस्तीस कोटी साधू संत, देव पुरूष, माता नाहीयेत. त्यामुळे ते लगेच एकत्र होतात आपण आपले घराला आग लागायची वाट पहात बसतो. आजपर्यंत झाले ते झाले, आत्ता या उत्सवापासून सूचिता पाळून सण साजरे करावेत आणि एकी दाखवून देश समृध्द करावा.

प्रकाश महागावकर, पुणे



औरंगाबाद : आज पुंडलिकनगर व जवाहरनगर पोस्ट हद्दीत परिमंडळ दोन व उस्मानपुरा विभागाच्या वतीने गणेश उत्सवाच्या अनुषंगाने सेवन हिल गजानन महाराज मंदिर चौक गारखेडा ते सुतगिरणी चौक परिसरात पथसंचलन घेण्यात आले. सदरचे पथसंचलन पोलीस उपायुक्त दोन यांचे नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस आयुक्त उस्मानपुरा विभाग तसेच रॅपिडक्शन फोर्स चे अधिकारी व अमलदार, सीआरपीएफ चे अधिकारी व अमलदार, आरसीपी व उस्मानपुरा विभागातील सर्व पोलीस निरीक्षक, दुय्यम अधिकारी, पोलीस अंमलदार व होमगार्ड यांनी सहभाग घेऊन पथसंचलन केले आहे.

# जम्मूजवळ भीषण अपघात

आधुनिक केसरी न्यूज

**जम्मू :** किश्तवाड जिल्ह्यात कार दरीत कोसळून आत्तापर्यंत ८ जणांचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. दरम्यान या भीषण अपघातानंतर बचाव कार्य चालू असल्याची माहिती जम्मू-काश्मीर पोलीसांनी दिली आहे. हे वाहन अनियंत्रित होऊन दरीत कोसळले. दरम्यान या अपघातात आठ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे, तर तीन जण जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि पोलिसांचा ताफा घटनास्थळी दाखल झाला. सध्या मदत आणि बचावकार्य सुरू आहे. किश्तवाडच्या विद्यार्थ्यांच्या चिनगाम भागात खासगी टॅक्सी वाहन टाटा सुमोवरून चालकाचे नियंत्रण सुटले.



# पंतप्रधान मोदींच्या हस्ते होणार स्वदेशी विमानवाहू युद्धनौका आयएनएस विक्रांतचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**कोची :** पंतप्रधान नरेंद्र मोदी 2 सप्टेंबरला कोचित शिपयार्ड लिमिटेड मध्ये देशाती पहिली स्वदेशी विमानवाहक INS विक्रांत चालू करणार आहेत. पंतप्रधान कार्यालायाकडून सांगितले आहे की मोदी हे कार्यक्रमाच्या निमित्ताने 1 आणि 2 सप्टेंबरला कर्नाटक, केरळमध्ये दौरा करणार आहेत आणि येथील कोचित विमानतळाजवळ कलाडी गावात भारतीय विद्वान 'आदि शंकराचार्य' यांच्या जन्मस्थळाला भेट देणार आहेत. त्यानंतर मंगलुरू मध्ये सुमारे 3,800 करोड रूपयांच्या योजनेचे उद्घाटन आणि पायाभरणी करणार आहेत. पीएमओने म्हटले आहे की मोदी हे आत्मनिर्भरतेचे खंबीर समर्थक आहेत, खास करून धोरणात्मक क्षेत्रांमध्ये. आयएनएस विक्रांत चालू होणे हे एका दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरेल. स्वदेशी बनावटीची ही पहिली विमानवाहू युद्धनौका असेल. भारतीय नौदलाच्या इन-हाऊस वॉरशिप डिझाईन ब्युरोद्वारे डिझाइन केलेले आणि सार्वजनिक क्षेत्रातील शिपयार्ड कोचीन शिपयार्डने तयार केलेले, विक्रांत हे अत्याधुनिक ऑटोमेशन सुविधांनी तयार केलेले आहे. आणि ते सागरी क्षेत्रातील आतापर्यंतचे सर्वात मोठे जहाज आहे.

# भाजपचे मिशन बारामती नव्हे तर महाराष्ट्र : फडणवीस

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** श्री चक्रधर स्वामींनी मराठी भाषेतील पहिला ग्रंथ लिहिला त्या रिद्धपुरला मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्याची घोषणा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. तसेच भाजपचे मिशन बारामती नसून महाराष्ट्र असल्याचे त्यांनी माध्यमांशी बोलतांना सांगीतले.



नाशकात सुरू असलेल्या अखिल भारतीय महानुभाव संमेलनात मंगळवारी (दि. ३०) ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर ग्रामविकास मंत्री गिरिश महाजन, राष्ट्रवादीचे नेते एकनाथ खडसे यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते. फडणवीस म्हणाले, रिद्धपुरला मराठी भाषा विद्यापीठ स्थापनेसाठी २०१४ मध्ये समिती स्थापन नेमली होती. समितीचा अहवालही आला होता. मात्र २०१९ मध्ये राज्यात सत्तांतर झाल्यानंतर हा विषय मागे पडला. चक्रधर स्वामींच्या अष्ठशताब्दी निमित्ताने या विद्यापीठासाठी पुन्हा प्रयत्न सुरू केले आहे.

याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत चर्चा देखील झाली आहे. लवकरच बैठक देखील होईल, असे आश्वासन त्यांनी दिले. दरम्यान भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या बारामती दौऱ्याबाबत माध्यमांनी विचारले असता, भाजपचे मिशन बारामती नव्हे तर महाराष्ट्र असल्याचे त्यांनी सांगितले.

# सीबीआय चौकशी करा


## सोनाली फोगाट यांच्या मुलीची आग्रही मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** अभिनेत्री आणि भाजपच्या नेत्या सोनाली फोगाट यांच्या आकस्मात मृत्यूची सीबीआय चौकशी व्हावी अशी मागणी त्यांची मुलगी यशोधरा फोगाट हीन केली आहे. सध्या गोवा पोलिसांकडून सुरु असलेल्या या प्रकरणाच्या चौकशीवर कुटुंबीय समाधानी नसल्याचे तिने म्हटले आहे.

हरयाणाचे मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर यांनी या प्रकरणात सीबीआय चौकशीचे आश्वासने दिले आहे, असेही यशोधरा हीने सांगितले आहे. सोनाली फोगाट यांच्या कुटुंबियांनी २७ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री खट्टर यांची भेट घेतली होती. यानंतर जर फोगाट यांच्या कुटुंबियांनी सीबीआय चौकशीची मागणी केली तर तसे निर्देश आम्ही देऊ, असे म्हटले होते.

दरम्यान, अद्याप या प्रकरणी कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, असा आरोप सोनाली यांच्या मुलीने केला आहे. आरोपीला गोव्यात ठेवण्यात आले असून त्यांचा या हत्येमागचा हेतू काय होता हे



अद्याप आम्हाला सांगण्यात आलेले नाही. मग पोलीस नक्की काय करताहेत? माझ्या आईला न्याय मिळवून देण्यासाठी हे सर्व सुरु आहे. जोपर्यंत या प्रकरणाची सीबीआय चौकशी होत नाही तोपर्यंत मी मागे हटणार नाही.

**आईच्या मृत्यूचा सुनियोजित कट**

आपल्या आईचा मृत्यू हा सुनियोजित कट होता असा आरोपही यशोधरा फोगाट हीने केला आहे. माझ्या आईने मला सांगितले होते की, गोव्यात माझे शुटिंग एक आठवड्यासाठी असेल. पण रिसॉर्ट केवळ दोनच दिवसांसाठी बुक करण्यात आले होते. यावरुन हे स्पष्ट होते की, हा सुनियोजित कट होता.

## शेअर बाजार का गडगडला ?

आधुनिक केसरी

जागतिक पातळीवर गुंतवणूकदार अमेरिकी मध्यवर्ती बँक फेडरल रिझर्व्ह- अर्थात 'फेड'चे अध्यक्ष जेरोम पॉवेल हे पतविषयक दृष्टिकोन आणि मूल्यमापनाची प्रतीक्षा करत होते. पॉवेल यांच्या आठ मिनिटांच्या भाषणाने अमेरिकी शेअर बाजारात गुंतवणूकदारांचे ७८ अब्ज डॉलरचे म्हणजेच सुमारे ६.२४ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले. अमेरिकेच्या व्योमिंग राज्यातील जॅक्सन होल या गावात 'फेड'ची वार्षिक परिषद होत असते. 'फेड'चे अध्यक्ष जेरोम पॉवेल यांच्या भाषणाकडे यंदा जगभरातील गुंतवणूकदारांचे लक्ष लागले होते. त्यांच्या भाषणातून पतविषयक दृष्टिकोन मांडला जाईल या शक्यतेने जगभरातील गुंतवणूकदारांनी गेल्या काही दिवसांपासून सावध पवित्रा घेतला, तर काही हवालदिल गुंतवणूकदारांनी नफावसुलीला प्राधान्य दिले. 'महागाईविरोधातील लढाई अजूनही संपलेली नाही, ती चालू राहील' असे पॉवेल यांनी सांगितले. अमेरिकेतील महागाई दराने ४० वर्षांतील उच्चांकी पातळी गाठली आहे. जुलै महिन्यात अमेरिकेत इंधनाचे दर कमी झाल्याने महागाई नरमली. मात्र अजूनही महागाई दर उच्चांकी पातळीच्या जवळ कायम आहे. यामुळे महागाई कमी करण्यासाठी आगामी व्याज दरवाढदेखील आक्रमक राहण्याचे संकेत दिले आहेत. चालू वर्षांत अमेरिकेने व्याज दरात दीड टक्क्याने वाढ केली आहे. अमेरिकेत व्याजाचे दर वाढणार असल्याने परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार (एफआयआय) पुन्हा एकदा स्वदेशी गुंतवणूक करण्यात धन्यता मानेल. कारण भारतीय भांडवली बाजारापेक्षा अमेरिकेतील भांडवली बाजार त्यांच्यासाठी अधिक आकर्षक बनतील.

गेल्या नऊ महिन्यांपासून देशांतर्गत भांडवली बाजाराकडे पाठ फिरवलेल्या एफआयआयने ऑगस्ट महिन्यात भारतीय भांडवली बाजारात पुन्हा सक्रिय होत ५०,००० कोटींची गुंतवणूक केली होती तसेच ऑगस्ट महिन्यात सेन्सेक्सने पुन्हा ६०,००० अंशांची पातळी गाठली होती. आता मात्र संभाव्य व्याज दरवाढीमुळे पुन्हा एकदा परदेशी गुंतवणूकदार भारतीय बाजाराकडे पाठ फिरवण्याची शक्यता आहे. अमेरिकी फेडरल रिझर्व्हच्या अध्यक्षांनी व्याज दरात वाढीचे संकेत दिल्याबरोबर भारतीय रुपयावर परिणाम दिसून आला. डॉलरच्या तुलनेत रुपयाने आधीच जुलै महिन्यात ८० प्रति डॉलरची नीचांकी पातळी गाठली. त्यांनतर रिझर्व्ह बँकेकडून करण्यात येणाऱ्या उपाययोजनांमुळे तो सावरला होता. आता मात्र पॉवेल यांच्या वक्तव्यानंतर त्याने डॉलरपुढे पुन्हा नांगी टाकत ८० रुपयांची पातळी गाठली. शिवाय अमेरिकेच्या मध्यवर्ती बँकेकडून स्पष्ट आणि आक्रमक दरवाढीचे संकेत मिळाल्यानंतर रिझर्व्ह बँकेकडून पुन्हा एकदा मोठी व्याज दरवाढ अपेक्षित आहे. रेपो दरात संभाव्य वाढीमुळे देशातील बँकांकडून कर्जाचे दर वाढवले जातील. ज्याचा थेट परिणाम कर्जदारांच्या ईएमआय अर्थात कर्ज हप्ता वाढीवर होईल. शिवाय आंतरराष्ट्रीय पातळीवर खनिज तेलाचे दर पुन्हा १०० डॉलर प्रतिपिंपापुढे गेल्याने आयात खर्चात वाढ होण्याची शक्यता आहे.

## गंगारामची पोपटपंची आणि गोलमाल उदाहरणे !



रवींद्र मुळे
संपर्क क्र : ९४२२२२१५७०

आधुनिक केसरी

**अभिनय येतो म्हंटल्यावर सर्व विषयावर आपण बोललेच पाहिजे हा काहीजणांचा समज झाला आहे. तसा समज आम्हीच या मंडळींना नको इतके डोक्यावर घेऊन करून दिला आहे. त्यामुळे कला आणि साहित्याच्या मार्गाने आपले छुपे वैचारिक आणि राजकीय अजेंडे पुढे नेण्याचा प्रयत्न ही मंडळी सातत्याने करत राहतात. सकाळच्या सप्तरंग पुरवणीत अमोल पालेकर नामक ढोंगी माणसाने जे काही लिहले आहे ते ह्याचे मासलेवाईक उदाहरण आहे.**

'जीवनधारा' नावाचा एक हिंदी सिनेमा १९८० च्या काळात आला होता. त्यात अमोल पालेकरने गाणे म्हंटले होते गंगाराम नावाच्या पोपटाचे! कायमच भोळा भाबडा, प्रेक्षकांची सहानुभूती मिळवणारा मध्यमवर्गीय नायक रंगवून प्रेक्षकांची सहानुभूती मिळणारे पात्र भूषवणारा हा अभिनेता कायमच प्रेक्षकांच्या भावना पुरोगामीत्वाच्या नावाखाली लाथाडत राहिला. मध्यमवर्गीय प्रेक्षक त्याच्यात स्वतःला पाहत असताना हा कलाकार त्यांनाच मूर्ख ठरवत गेला. नुकतेच झालेले त्यांचे एक भाषण किंवा लेख याचेच उदाहरण आहे. (हा लेख बृहन महाराष्ट्र मंडळाच्या कार्यक्रमातील भाषण आहे)

अभिनय येतो म्हंटल्यावर सर्व विषयावर आपण बोललेच पाहिजे हा काहीजणांचा समज झाला आहे. तसा समज आम्हीच या मंडळींना नको इतके डोक्यावर घेऊन करून दिला आहे. त्यामुळे कला आणि साहित्याच्या मार्गाने आपले छुपे वैचारिक आणि राजकीय अजेंडे पुढे नेण्याचा प्रयत्न ही मंडळी सातत्याने करत राहतात. सकाळच्या सप्तरंग पुरवणीत अमोल पालेकर नामक ढोंगी माणसाने जे काही लिहले आहे ते ह्याचे मासलेवाईक उदाहरण आहे.

बृहन महाराष्ट्र मंडळाच्या कार्यक्रमात हे साहेब प्रमुख पाहुणे होते. त्यांनी सांगितल्याप्रमाणे कुठलाही राजकारणी नव्हता त्यामुळे ते उपस्थित राहिले. इतके राजकारणापासून हे महाशय अलिप्त आहेत. या भाषणात आवर्जून हिंदुस्थान नाही मी भारत म्हणतो असा एक तिरकस डावा कटाक्ष टाकताना धर्मनिरपेक्षता, विवेकवाद, स्त्रीवाद वगैरे ठरलेले शब्दप्रयोग वापरून शेवटी संगणक, आर्टिफिशियल बुद्धिमत्ता इथपर्यंत प्रवास करताना मराठी आणि महाराष्ट्र याचा त्यांचा अभिमान अगदी उर फाटेपर्यंत व्यक्त झाला आहे. अर्थात यात कुठलाही संकुचित प्रादेशिक वाद नाही हे आपण समजायचे आहे.

पालेकरसारख्या विचारवंतांच्या दृष्टिकोनातून प्रतिगाम्यांची अखंड भारत संकल्पना संकुचित असते, संस्कृत ही संगणक योग्य भाषा अवैज्ञानिक असते पण त्यांचे सगळेच व्यापक असते मग पालेकरांचा मराठी अभिमान असो, नाही तर गिरीश कर्नाड यांचे कन्नड प्रेम असो.

वेगवेगळे लेखक आणि पुस्तके यांची नावे घेत आणि शिवाजी महाराज, ज्योतिबा यांचा उल्लेख करत आपण कसे प्रतिभावंत आहोत हे दाखवण्याची धडपड त्यांनी केली आहे. आपण कसे चित्रकार आहोत आणि त्यामुळे चित्रकला, शिल्पकला यावर बोलण्याचा निसर्गदत्त अधिकार आहे म्हणून काही व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. पण शेवटी दुखते कुठे आहे ते बाहेर पडलेच आहे.

एकूणच २०१४ नंतर जे राजकीय परिवर्तन झाले त्याचे सर्वच क्षेत्रात परिणाम दिसायला लागले. मुळात राजकीय परिवर्तनामागे मुख्य कारण हे समाजात मोठ्या प्रमाणात झालेले परिवर्तन हे कारण होते आणि आहे हे अनेक जण विसरले आहेत. केंद्रात पुन्हा दुसऱ्या वेळेस प्रचंड बहुमताने या सरकारला जनतेने निवडून दिले. त्यामुळे अनेक मंडळींचे



सांस्कृतिक अनुदान या गोंडस नावाखाली मिळणारे मालिदे, आलटून-पालटून मिळणारे पुरस्कार, परदेश वाऱ्या यावर बंधने आली आहेत. त्यात दिल्लीतील लुटीयन्स वर्ग जसा आहे तसे बॉलिवूडमधील असंतुष्ट आत्मे पण आहेत आणि रंगभूमीवरील पण अनेक मंडळी आहेत. अमोल पालेकर हे तर बॉलिवूड आणि नाटकातील पुरोगामी यांची विशेष सरमिसळ. त्यामुळे हे सगळे अस्वस्थ आत्मे वेगवेगळे व्यासपीठे, माध्यमे शोधून सध्याचा काळ किती कठीण आला आहे हे उच्च रवाने सांगतात.

१९७५ चा आणीबाणीचा काळ आठवतो ना? अमोल पालेकर याना विस्मरण झाले असावे. कारण त्यांच्या दृष्टीने काही गोष्टी 'छोटीसी बात' असू शकतात ! पण ज्याच्या पार्श्वगायनाचा उपयोग झाल्यामुळे गोलमाल सिनेमातले गाणे लोकप्रिय झाले त्या किशोरदा यांच्या गायनावर आकाशवाणीवर बंदी घालणारे कोण होते? तुम्ही कुणी का नाही आवाज उठवला? साहित्यावर गप्पा मारणारे अमोल पालेकर यांनी पू. ल. देशपांडे यांचे नाव घेतले, पण आणीबाणितील सेन्सॉर शिपला पू. ल. आणि दुर्गाबाई भागवत यांनीच कडाडून विरोध केला तेव्हा हेच कलेच्या स्वातंत्र्यासाठी गळे काढणारे पालेकर स्वतःच्या फिल्मी करिअरमध्ये व्यस्त होते.

अलीकडील काळात स्वर्गीय लता दीदी किंवा सचिन यांनी भारताच्या भूमिकेचे केलेले ट्विटद्वारा समर्थन हे पुरोगामी म्हणणाऱ्या महाराष्ट्रात सहन न झाल्यामुळे त्यांच्यावर अश्लाघाय टीका झाली तेंव्हा अमोल पालेकर कुठे होते? स्वतः हृदयनाथ सांगतात सावरकरांच्या समर्थनार्थ गीत गायल्यामुळे त्यांचे नोकरीचे कॉन्ट्रॅक्ट संपवले गेले तरी पण ते खरे न मानता त्यांना दूषणे दिली गेली तेंव्हा अमोल पालेकर कुठे होते? विशिष्ट विचारधारेच्या मंडळींनी सत्तेतील लोकांशी युती करून राष्ट्रीय विचारधारा दाबून एक पुरोगामी दहशतवाद निर्माण केला होता तो दहशतवाद आता संपत चालला आहे हे खरे अमोल पालेकर यांचे दुःख असावे.

स्त्रीवादाचे साहित्यातील प्रतिबिंब यावर हे विद्वान या लेखात खूप मानवीभावीपणाने बोलतात पण पालेकर याना हिंदी सिनेमातला तो प्रसिद्ध संवाद आठवत असेलच बहुतेक ' खुद के गिरेबान मे झाक के तो देख !' व्यक्तिगत जीवन झाकून ठेवायचे आणि समाजाला पोपटपंची शिकवायची हे धंदे आता फार काळ टिकणारे नाहीत. या विषयात चित्राताई जास्त प्रकाश टाकू शकतील !

गेल्या काही महिन्यांपूर्वी रंगभूमीवरील एक ज्येष्ठ कलाकार विक्रम गोखले यांनी काही मत व्यक्त केले होते, भाऊ कदम याने गणपती उत्सव साजरा केला होता, प्रवीण तरडे यांनी पुस्तकाची आरास केली होती, केतकी चितळेने काही कविता शेअर केली होती या सगळयांना कुठल्या प्रकारची वागणूक मिळाली? कंगना राणावत यांचा बंगल्यावर हातोडा चालवला गेला तेव्हा यांची दातखीळ बसली होती का? तेव्हा पुरोगामी महाराष्ट्रातील तमाम ही अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे पुरोगामी पिलावळ कुठे गेली होती?

यांचे आणखी एक दुखणे म्हणजे जागृत समाजाने उपसलेले बहिष्काराचे शस्त्र! ज्या जनतेच्या पैशावर मजा मारत आपल्याला हवे तसे चित्रित करून त्याच जनतेच्या श्रद्धा आणि भावना दुखावण्याचा धंदा आता चालणार नाही याची चिंता त्यांना लागली आहे आणि मग अस्वस्थ होत ही मंडळी कलेच्या स्वातंत्र्याच्या नावाने ओरडत आहेत.

पालेकरांनी लिहलेला मजकूर आणि त्याचा मथळा याचा तसा काहीच संबंध नाही हे वाचल्यावर लक्षात येते पण त्यांची मळमळ मथळ्यातून व्यक्त होते आणि मजकुरातून एक तद्दन ढोंगी विचारवंत व्यक्त होतो. नकली मिशा लावून उत्पल दत्तला फसवता येईल, पण जागृत समाजाला नाही हे पालेकरांनी उतार वयात समजून घेण्याची गरज आहे.

करण जोहर कुठलेही घाणेरडे प्रश्न अभिनेत्रींना विचारतो! रणवीर आपले नग्न फोटो टाकतो ! मनाला येईल तसे सोशल मीडियामध्ये कलेच्या नावाखाली सवंग शरीर प्रदर्शन आणि स्त्री-पुरुष संबंधांची निर्लज्ज चर्चा याने रिॲलिटी शो चालवले जात आहेत. अमोल पालेकर या पुरोगामी विद्वानाला यापेक्षा अजून कलेतील कुठले स्वातंत्र्य अपेक्षित आहे? आदिम जमान्यातील नग्न अवस्था म्हणजे पुरोगामी कला म्हणायची का? मादक द्रव्ये आणि व्यसनांचे हिडीस प्रदर्शन म्हणजे मुक्त कलेचा आविष्कार म्हणायचा का?

बऱ्याच लेखकांची आणि पुस्तकांची यादी लिहून काढताना आपले वाचन कसे चौफेर आहे हा दाखवण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. आपण केवळ पोटभरू कलाकार नसून विचारवंत आहोत हे दाखवण्याचा केविलवाणा प्रयत्न पालेकरांनी वारंवार केला आहे! हा आणखी एक त्यांचा प्रयत्न म्हणजे ' सुंभ जळाला तरी पीळ सुटत नाही !' या म्हणीची आठवण करून देणारा आहे !

अर्थात बदललेला काळ आणि परिस्थिती यांच्या आकलनाच्या बाहेरची आहे त्यामुळे त्या सिनेमात आणि त्या गाण्यात तो नायक जसा कालबाह्य आणि दुर्लक्षित होतो आणि गंगारामचे गाणे म्हणत लोकांचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न करतो तेच आणि तेव्हढेच पालेकरांच्या लेखाचे / भाषणाचे महत्व आहे.

## गणपती जरुर बसवा, पण सावधगिरी बाळगा



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र.: ९३७३३५९४५०

आधुनिक केसरी

**गणपती या दहा दिवसात मातीची मुर्ती जरी असला तरी तो आम्हाला सजीव वाटतो. त्याच्यासाठी मग सर्वच काही करण्याच्या आमच्या कला आम्ही पणास लावतो. वेगवेगळे प्रसाद बनवून त्याला भोग देतो. तो खात नाही हे माहीत असूनही सारंच काही त्याच्यासाठी....आणि शेवटी दहाव्या दिवशी त्याचा विचार न करता, त्याची इच्छा नसतांनाही त्याला नाल्यात नेवून टाकतो. हे आमचं कितपत बरोबर आहे? गणपती बाप्पा आमच्या श्रद्धेचा विषय असतांना त्याला नाल्यात नेवून टाकणे आम्ही कसे सहन करतो ही विचार करायला लावणारी बाब आहे. खरं तर विघ्न विनाशक असलेल्या आमच्या गणपती बाप्पाला आम्ही एखादं मंदीर बांधून आमची श्रद्धा जोपासायला हवी. त्याला सुरक्षीत ठेवायला हवे. त्याची सुरक्षा करायला हवी.**

गणपती बाप्पा मोरया म्हणत आजकाल गणपती बापाची लोकांनी फॅशनच निर्माण केली आहे. लोकांना वाटते की गणपती बाप्पाला मांडले आणि दहा दिवस पुजा केली की बस झालं. साऱ्या समस्या चुटकीसरशी सुटल्या. खरंच सुटतात का समस्या? याचे कारण नाही असंच असेल. पण तरीही आम्ही मांडतो आहोत. त्यासाठी लाखो रुपये खर्च करतो आहोत. का? तर आमच्या सुखासाठी. आमच्या चेहऱ्यावर आनंद झळकावा यासाठी... क्षणभर का होईना आम्हाला आमचे दुःख विसरता यावे यासाठी...

गणपती हे पुर्वी पाण्यात बुडवीत नसत. त्याचा फार मोठा इतिहास आहे. तो सांगण्याची गरज नाही. घरोघरी गणपती मांडले जात नव्हे तर त्याची विल्हेवाट न लावता घरचा एक सदस्य म्हणून वर्षभर त्याची पूजा होत असे. एखाद्या वेळी त्याचा एखादा अवयव तुटलाच तर त्याला तुळशीजवळ ठेवून ती माती तुळशीच्या झाडाला अर्पण करीत असत. त्या मातीत झाडांची वाढ चांगली होते. हा लोकांचा उद्देश असायचा. अलीकडे लक्ष्मीच्या मुर्तीची जशी विल्हेवाट लावली जाते तशी. तसं गणपतीचं केलं जात असे.

कालांतरानं आम्ही शिकलो-सवरलो, मोठे झालो. आमच्या भावना मोठ्या झाल्या. त्याबरोबर आमच्यात स्वार्थ शिरला. आमचा स्वार्थही मोठा झाला. चक्क यात आम्ही गणपतीबाप्पालाच पैसे कमविण्याचं साधन बनवलं. मग वेगवेगळ्या स्पर्धा घेवू लागलो. त्याचे शुल्कही ठरवू लागलो आणि अमाप पैसा गोळा करुन ती रक्कम वाटून स्वतःचा चरितार्थ चालवू लागलो. काही लोकं तर भरमसाठ वर्गणी गोळा करु लागले. खर्च करुन जी रक्कम उरेल. ती रक्कम सर्व सदस्य मंडळी एकमेकात वाटून घेवू लागले किंवा त्या रकमेतून दारु सुद्धा पिवू लागले. ही वास्तविकता कित्येक ठिकाणी अनुभवायला मिळाली. हे भरपूर ठिकाणी आजही घडत आहे.

एकंदरीत सांगायचे झाल्यास गणपती बाप्पाच्या नावावर आम्ही तमाशा ऊभा केला आहे. गणपती बाप्पा बनवितांना कुंभार समाजाचे योगदान अनन्यसाधारण आहे. त्या समाजातील बहुतेक जणांना काम मिळतं. त्यांचं पोटही भरत असतं नव्हे तर या गणपती उत्सवाच्या निमित्याने भरपूर लोकं आपले पोट भरीत असतात. पण त्याबरोबर गणपती बाप्पाच्या नावावर आजही ग्रामीण भागात तमाशाचे फड रंगतात. ते पाहायला गावातील तरुण तरुणी आवडीने जात असतात. त्यात स्त्रियांच्या वेशभुषेत पुरुष मंडळी नाचत असतात. एकमेकांना चिमटे काढत असतात. हे कलाकारांच्या कलात्मकतेचं प्रदर्शन जरी असलं आणि त्याची मजा गावातील लोकांना जरी येत असली तरी या तरुण तरुणींना बिघडविण्याच्या गोष्टी आज होत चाललेल्या आहेत. अर्थात गणपतीबाप्पाच्या नावावर हे सारं खपविणाऱ्या गोष्टी आज घडत आहेत. एवढेच नाही तर आजतरी या गणपती बाप्पाच्या दर्शनाला येणारी तरुण मुले-मुली आपल्या आईवडीलांना विचारुन येतातच असे नाही. मित्रांसोबत दोन दिवसासाठी फिरायला जात आहो असा बहाना करुन ही तरुण-तरुणी दर्शनाच्या नावावर आजही येतात आणि दर्शन घेण्याऐवजी रुम करुन मादकतेचा आनंद घेत असतात. हे दृश्य मात्र आपला गणपती बाप्पा नाईलाजानं सहन करीत असतो.

या सर्व गोष्टीचा विचार करण्याची आजतरी गरज आहे.

गणपतीबाप्पाला बसवा. कामगारांना काम मिळू द्या. त्यांचेही पोट भरु द्या. बसवण्याला मनाई नाही. पण त्यांचे नावावर व्यापार करु नये. अश्लीलतेचं प्रदर्शन करु नये. देणगीच्या नावावर कोणावर बळजबरी करु नये वा कोणाला मुर्ख बनवू नये.

गणपतीला विद्येची देवता समजतात. त्याचे स्थान अबाधीत राहू द्यावे. त्याच्या परिसरात घाण करु नये. तरुण तरुणींनी दर्शनाला अवश्य जावे. पण आपल्या आईवडीलांसोबत. उत्सव साजरा करायला. उत्सव साजरा केलाच पाहिजे. पण केवळ अंगप्रदर्शन करुन हातात हात ठेवून स्वतःचे गणपतीबाप्पासोबत सेल्फी काढून स्वतःचा जीव धोक्यात घालू नये.

गणपती विसर्जनाच्या वेळी नेहमी बातम्या येतात. गणपती शिरवतांना अमुक अमुक मरण पावले. असे व्हायला नको. गणपती शिरवावा. पण सावधानता बाळगायला हवी ना. पण आम्ही आईवडीलांना न जुमानणारी मुले. खरंच सेल्फी काढायला घाबरु! कधीच नाही. मग गणपती बाप्पा सोबतीला आहे असा विचार करुन आम्ही सावधगीरी न बाळगता गणपती शिरवतो. त्यात चुकीनं स्वतःच मरतो. मात्र मायबाप बिचा-या गणपतीला दोष देतात. त्यात मातीच्या त्या गणपतीचा कोणता दोष? तो स्वतःची इच्छा नसतांनाही स्वतःचा जीव वाचवू शकत नाही. तो तुमचा जीव कसा वाचविणार! म्हणून गणपती बाप्पाला जरुर बसवा. पण थोडी का होईना सावधानता जरुर बाळगा. त्यातच तुमचाच फायदा आहे. खबरदारी घ्या, जेणेकरुन कोणत्या बऱ्या-वाईटपणाचे तुमच्या गणपती बाप्पावर लांछन लागायला नको.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# आगमन गणपती बाप्पाचे




सौ. सीमा मंगरुळे
संपर्क क्र. 9075074994


आधुनिक केसरी

**भाद्रपद शुक्ल पक्षात देवांचा देव श्रीगणेशाचे पृथ्वीवर धुमधडाक्यात आगमन होते. देवगण, मनुष्यगण, राक्षस गण या तिन्ही गणांचा ईश म्हणजेच गणपती. कोणत्याही शुभकार्याची सुरुवात श्रीगणेश पुजनानेच होते. गणेश म्हणजे गुणांचा पती गणेश हा मानाचा देवता मानला जातो. आणि त्यास पृथ्वीतलावर खूप मानाचे स्थान आहे. जहाल मतवादी नेते लोकमान्य टिळक यांनी महाराष्ट्रात सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. आणि गणरायास एक विशिष्ट महत्व प्राप्त झाले. त्यामुळे घराघरात होणारे गणपतीचे आगमन आता चौकातील मंडळात होऊ लागले.**

**झाले तुझे आगमन गणराया**
**चराचरास आशीर्वाद द्यावया**
**सुख समृद्धी येवो घरा**
**मोदक लाडू येशी खावया.....**

भाद्रपद शुक्ल पक्षात देवांचा देव श्रीगणेशाचे पृथ्वीवर धुमधडाक्यात आगमन होते. देवगण, मनुष्यगण, राक्षस गण या तिन्ही गणांचा ईश म्हणजेच गणपती. कोणत्याही शुभकार्याची सुरुवात श्रीगणेश पुजनानेच होते. गणेश म्हणजे गुणांचा पती गणेश हा मानाचा देवता मानला जातो. आणि त्यास पृथ्वीतलावर खूप मानाचे स्थान आहे. जहाल मतवादी नेते लोकमान्य टिळक यांनी महाराष्ट्रात सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. आणि गणरायास एक विशिष्ट महत्व प्राप्त झाले. त्यामुळे घराघरात होणारे गणपतीचे आगमन आता चौकातील मंडळात होऊ लागले. दिव्यांच्या माळा, आरास, धुपदिपांचा सुगंध सर्वत्र दरवळू लागला.

मोदकाचा नैवेद्य खास आवडीचा म्हणून घराघरात मोदक गोड पदार्थ प्रसाद तयार होऊ लागला. गणपती सोबत गौराईचे आगमन होत असल्याने महिलांचा हा सण जिव्हाळ्याचा बनू लागला.मग गौरी गणपती ची सजावटीसाठी घराघरात सुद्धा चढाओढ सुरू झाली. माहेरवाशिणी गाणे गुणगुणु लागल्या -

**बंधू येईल माहेरी न्यायला**
**गौरी गणपतीच्या सणाला....**

अंगणात माहेरची गाणी फेर धरुन महिला, माहेरवाशीणी गाऊ लागल्या. माहेर आणि सासर सुखसमृद्धी ने भरू दे हे बाप्पाकडे वाण मागू लागल्या. पतीचे आयुष्य वाढावे यासाठी सौभाग्यवती हरितालीकेचा उपवास करतात. तर महादेवासारखा पती मिळावा यासाठी कुमारिका ही हरितालिका हे वृत मनापासून करतात. गणरायाचे आगमन पृथ्वीतलावर शुभ मानले जाते.

गणपती हे पार्वती आणि भगवान शिव यांचे पुत्र आहेत. गणपतीच्या पत्नीचे नाव रिद्धी आणि सिद्धी आहे. रिद्धी आणि सिद्धी भगवान विश्वकर्माच्या मुली आहेत, त्याच भगवान विश्वकर्मा ज्याचे वंशज लोहार आहेत. भगवान शिव आणि भगवान विश्वकर्मा यांचे नाते खूप जवळचे आहे. सर्व सहा भावंडांमध्ये तो सर्वात लहान आहे. गणपती बाप्पा इतर देवदेवतांपेक्षा दिसायला वेगळे दिसतात. याचीही कथा पुराणात सांगितले आहेच.

**वक्र असे मुख**
**लंबोदर म्हणती तुज**
**देवांचा असे तु देव**
**बुद्धीची देवता म्हणती तुज**

## गणपती बाप्पा कसे दिसतात?

गणपती हा आदिदेव आहे ज्याने प्रत्येक युगात वेगवेगळे अवतार घेतले. त्यांच्या शारीरिक रचनेचाही एक विशिष्ट आणि खोल अर्थ



आहे. शिवमनास पूजेत श्री गणेशाला प्रणव (ओम) म्हणतात. या अखंड ब्रह्मामध्ये वरचा भाग गणेशाचे मस्तक, खालचा भाग उदर, चंद्रबिंदू लाडू आणि सोंड हे प्रमाण आहे. त्याला चार हात आहेत जे सर्व चार दिशांमध्ये सर्वव्यापकतेचे प्रतीक आहेत. तो एक लंबोदर आहे कारण संपूर्ण दयाळू सृष्टी त्याच्या उदरात फिरते. मोठे कान अधिक ग्रहणक्षमतेचे लक्षण आहेत आणि लहान तीक्ष्ण डोळे सूक्ष्म-तीक्ष्ण दृष्टीचे सूचक आहेत. त्याचे लांब नाक (प्रोबोस्किस) हे महान बुद्धिमत्तेचे प्रतीक आहे.

## गणपती बाप्पा बद्दल कथा

प्राचीन काळी सुमेरू पर्वतावर सौभारी ऋषींचा अतिशय नयनरम्य आश्रम होता. त्यांच्या अत्यंत सुंदर आणि सद्गुणी पत्नीचे नाव मनोमय होते. एक दिवस ऋषी जंगलात लाकूड घेण्यासाठी गेले आणि मनोमय गृहपाठात गुंतले. त्याच वेळी कौंचा नावाचा एक दुष्ट गंधर्व तेथे आला आणि जेव्हा त्याने अद्वितीय लावण्यवती मनोमय पाहिले तेव्हा तो अस्वस्थ झाला.

कौंचने ऋषी-पत्नीचा हात धरला. रडणे आणि थरथरणे,ऋषी पत्नी त्याच्याकडे दयेची भीक मागू लागली. त्याच क्षणी सौभारी ऋषी आले. त्याने गंधर्वांना शाप दिला आणि म्हणाला, 'तू माझ्या साथीदाराचा हात चोरांसारखा पकडला आहेस, यामुळे तू उंदीर बनशील आणि पृथ्वीखाली तुझं पोट चोरेल.

थरथरणाऱ्या गंधर्वाने ऋषींना प्रार्थना केली– 'दयाळू ऋषी, माझ्या अविवेकामुळे मी तुमच्या पत्नीचा हात स्पर्श केला. मला क्षमा करा ऋषींनी सांगितले की माझा शाप व्यर्थ जाणार नाही, तथापि गणपती देव गजमुखांच्या मुलाच्या रूपात (गणेशजींनी प्रत्येक युगात वेगवेगळे अवतार घेतले) द्वापार मध्ये दिसतील, मग तुम्ही त्याचे नाव डिंक नावाचे व्हाल, ज्यावरून देवता तुमचा आदरही करेल. करू लागतील मग संपूर्ण जग तुमची श्री डंकजी म्हणून पूजा करेल.

गणेशाला जन्म न देता, आई पार्वतीने त्याचे शरीर निर्माण केले. त्यावेळी त्याचा चेहरा सामान्य होता. माता पार्वतीच्या स्नानामध्ये गणेशाची निर्मिती झाल्यानंतर आईने त्याला घराचे रक्षण करण्याचे आदेश दिले. आई म्हणाली की जोपर्यंत ती आंघोळ करत आहे, गणेशाने कोणालाही घरात प्रवेश करू देऊ नये. तेवढ्यात भगवान शंकर दारात आले आणि म्हणाले, "बेटा, हे माझे घर आहे, मला आत जाऊ दे." गणेशाने थांबवल्यावर भगवानाने गणपतीचे डोके त्याच्या धडातून कापले. गणेशला जमिनीवर निर्जीव पडलेले पाहून आई पार्वती विचलीत झाली. मग शिवाने आपली चूक ओळखली आणि गणपतीच्या धड्यावर गजांचे मस्तक ठेवले. त्याला पहिल्या पूजेचे वरदान मिळाले, म्हणूनच गणपतीची प्रथम पूजा केली जाते.

## गणपती बाप्पांचे लग्न

शास्त्रानुसार गणेश जी देखील विवाहित होते, त्याला दोन बायका आहेत ज्यांची नावे रिद्धी आणि सिद्धी आहेत आणि त्यांच्याकडून गणेश जीला दोन मुलगे आहेत, ज्यांची नावे शुभ आणि लाभ अशी आहेत. दोन शब्द जे तुम्ही अनेकदा त्याच्या मूर्तीसोबत पाहता आणि हे सर्व जन्म आणि मृत्यू मध्ये येतात, गणेश जीची पूजा केल्याने फक्त सिद्धी मिळते परंतु त्याच्या भक्तीने पूर्ण मोक्ष शक्य नाही.

## गणपती बाप्पांचे बारा नावे

गणेशजींची बरीच नावे आहेत, परंतु ही 12 नावे प्रमुख आहेत-सुमुख, एकदंता, कपिल, गजकर्णक, लंबोदर, विकटा, अडथळा-नाश, विनायक, धुम्रकेतू, गणध्याय, भालचंद्र, गजानन. वरील बारावे नाव नारद पुराणात पहिल्यांदा गणेशाच्या बाराव्या नावाने दिसते. विद्यारंभ आणि विवाहाच्या पूजेमध्ये या नावांनी गणपतीची पूजा करण्याचा कायदा आहे.

ज्योतिष शास्त्रानुसार गणेशाला केतू म्हणून ओळखले जाते. केतू हा सावली ग्रह आहे, जो नेहमी सावली ग्रह राहूच्या विरोधात असतो, विरोधाशिवाय ज्ञान नसते आणि ज्ञानाशिवाय मुक्ती नसते. गणेशावर विश्वास ठेवणाऱ्यांचा मुख्य हेतू आहे की त्याला सर्वत्र पाहणे, जर गणेश हे साधन असेल तर तो जगाच्या प्रत्येक कणात उपस्थित आहे. उदाहरणार्थ, गणेश हे साधन आहे, जीवन चालवण्यासाठी अन्न आवश्यक आहे, धान्य हे जीवन चालवण्यासाठी साधन आहे, म्हणून धान्य हे गणेश आहे.

धान्य तयार करण्यासाठी शेतकऱ्याची गरज असते, म्हणून शेतकरी गणेश आहे. जर शेतकऱ्याला धान्य पेरण्यासाठी आणि काढण्यासाठी बैलांची गरज असेल तर बैल देखील गणेश आहे. धान्य पेरण्यासाठी शेताची गरज आहे, म्हणून शेत गणेश आहे. जर धान्य ठेवण्यासाठी साठवण जागेची गरज असेल तर साठवणुकीची जागा देखील गणेश आहे. धान्य घरात आल्यानंतर त्याला दळण्यासाठी एक चक्की लागते, म्हणून ती गिरणीही गणेश आहे.

गिरणीतून बाहेर काढून रोटी बनवण्यासाठी तवा, चिमटा आणि रोटी बनवण्याची गरज असते, म्हणून हे सर्व गणेश आहे. खाण्यासाठी हातांची गरज असते, म्हणून हातही गणेश आहे. तोंडात खाण्यासाठी दात आवश्यक असतात, म्हणून दात देखील गणेश आहे. जे काही अर्थ वापरले जातात ते सांगणे, आयुष्यात, ते सर्व गणेश आहेत, केवळ शंकर पार्वतीचा मुलगा आणि देवता नाही.

विसर्जन करताना मात्र पाणी दुषीत होण्याचा संबंध असतो. कारण त्यात केमीकल असते.त्यासाठी शाडूचा गणपती आणावा जेणेकरून घरगुती सुद्धा त्याचे विसर्जन करता येईल.

**अकरा दिवस असे तुझा वास**
**दुर्वा ची जुडी ,असे तुझी खास**
**जास्वंद फुल तुला वाहती**
**राही तुझ्या साठी खास** **भाद्रपद मास**

# शेवटचा बाप्पा




सौ आरती राजाराम
परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345


आधुनिक केसरी

**गावभागात चौकात मंदिर होतं. हारफुल, कुंकू,उदबत्ती अष्टगंध,पेढे, खेळणीची दुकानं यांनी मंदीर परिसर गजबजलेला असायचा. दुसऱ्या बाजूला रंगाण्णा भाजीवाला आपलं छोटेखानी दुकान सांभाळत बसलेला असायचा. हिरवीगार काकडी, लालचुटुक टोमॅट, गाजर रसरशीत पालेभाज्या, कोवळी आणि चांगली भाजी, योग्य दरात विकून रोजीरोटी चालवायचा.**

अण्णा स्वभावाने प्रेमळ, शांत आपणं भलं आपलं काम भलं ह्या विचाराचा. अडल्या नडल्याला भाजी तशीच द्यायचा. भाजी नाशवंत असल्याने ती केरात न जाता कुणाच्या तरी मुखात जावी हाच त्याचा उद्देश असायचा. ना नफा ना तोटा! असा त्याचा धंदा. बाप्पा माझं चांगलं करणार हा त्याचा विश्वास.

अण्णाला दोन मुलं, श्रीनिवास आणि व्यंकटेश. दोघांच्या हट्टापायी घरात गणपतीची मूर्ती आणून त्याची पूजा करायला सुरुवात केली होती. त्याला जेमतेम दोन तीन वर्षे झाली होती. कोरोनाच्या काळात त्यांचा व्यवसाय ठप्प झाला. भाजीचा धंदा तर फारच संपला. जवळची जमापुंजी संपत आली त्यातच सत्यव्वाच्या आजाराने खुप खर्च झाला होता पण सत्यव्वा बाप्पाच्या कृपेने ठणठणीत बरी झाली होती.

संसाराला हातभार लावावा म्हणून ती तीन चार ठिकाणी स्वयंपाक काम करत होती. सुमतीबाई पटवर्धनांनी तिला मराठमोळ्या स्वयंपाकात तरबेज केले होते. इडली, डोश्याबरोबर मोदकही सुबक, सुंदर भरपूर कळ्यांचे, चवीष्ट बनवायची.

गणेशचतुर्थीचा उत्सव जवळ आला. ह्या वर्षी बाप्पाची मूर्ती आणायची, पण गणपतीची मूर्ती आणायलासुद्धा दोघांकडे पैसे नव्हते. चौकात सुर्याशेटजींचे दुकान होते. सुबक, देखण्या बाप्पाच्या शाडूच्या मूर्ती विकायचे. सोबतच बाप्पाच्या सजावटीसाठी लागणारे साहित्य पण विकायचे. देखणं सिंहासन, वेगवेगळी मखर, फुलांनी सजविलेला नक्षीदार पाट, चक्र, रंगबिरंगी झिरमिळ्या, लाईट्सचे वेगवेगळे प्रकार खुप काही मिळायचे.

यंदा दुकानात "कमळावर बसलेला बाप्पा" खास आकर्षणाचा विषय होता.

दुकानात रॅकवर कमळावर बसलेला बाप्पाच्या पन्नास ते साठ मुर्त्या होत्या. अण्णा मुलांबरोबर पहिल्यांदा दुकानात गेला तेव्हा देहभान हरपून त्या मूर्तीकडे पाहात होता. मुलांना आणि त्याला कमळावर बसलेला बाप्पाचीच मूर्ती खूप आवडली होती. कितने को दिया बाप्पा ? त्यांने अधिरतेने विचारले? साडेआठसौ ! असं उत्तर मिळताच त्याने आपला खिसा चाचपला. मनाशी खुणगाठ बांधून परत दोन तासांनी येवू आणि मुर्ती घेऊन जावू असं ठरवलं. त्याच्या दुकानात एक पण गिऱ्हाईक आले नाही. खिशात असलेले पैसे मोजले तर अडीचशे रुपये होते.

रात्र झाली दुकान बंद करून अण्णा घरी आला. उद्या घराघरात बाप्पा येणार ! मुलांना काय सांगावे? चेहरा मलूल झाला होता....

का वौ काय जालं? सत्यव्वाने विचारले. मग अण्णाने हकिकत सांगितली. ती म्हणाली बाप्पा हाय करेल तो सोय. जेवा आणि झोपा.



कमाळावर बसलेला बाप्पाची मूर्ती त्याच्या डोळ्यापुढून जाईना ११ विचार करत करत झोप लागली. पहाट झाली कसल्यातरी आवाजाने आणि गोड खमंग वासाने त्याला जाग आली. बघतो तर सत्यव्वाने सुबक, सुंदर, भरपूर कळ्यांचे पांढरे शुभ्र मोदक तयार केले होते. अग सकाळी सकाळी का करतेस? पटवर्धन काकूंची तब्येत ठीक नाहीये त्यामुळे त्यांना करून देते असं सत्यव्वा म्हणाली. पटवर्धन काकूंकडे गणेशचतुर्थीच्या दिवशी सकाळी सकाळी बाप्पा बसतो त्या वेळी नैवेद्य म्हणून उकडीचे मोदक त्या करायच्या पण ह्यावेळी त्यांची तब्येत बिघडली, पण सत्यव्वाने त्यांची वेळ ओळखून मोदक तयार करून दिले. मोठ्या पसरट डब्यात केळीचे पान ठेवून तीनं मोदक त्यावर ठेवले, सोबतच जाताना धाकट्या व्यंकटेशाला सोबत घेवुन गेली होती.

काकूंना तिच्या आर्थिक परिस्थिती माहीती होती. त्यांनी पैसे तिला पैसे द्यायचे ठरवले, पण सत्यव्वा स्वाभिमानी, प्रेमळ ती पैसे घेणार नाही म्हणून त्या म्हणाल्या सत्यव्वा आज मला तुझी ओटी भरावी वाटतीये तू नको म्हणू नकोस तीने पण मुकाट ओटी भरून घेतली त्यांनी साडी, खण, गजरा देऊन ओटी भरली आणि हजार रुपये हातात ठेवले, छोट्या व्यंकटेशाच्या हातात पाचशेची नोट घातली.

सत्यव्वाला काकूंच्या प्रेमळ अधिकारवाणी पुढे काहीच बोलता आले नाही, तीला ते मुकाटपणे घ्यावे लागले. सत्यव्वा हसत घरी आली तिने अण्णाच्या हातात पैसे ठेवले. तिला अण्णा ओरडला तू मोदकांचे पैसे काकूंकडून कसे घेतलेले? तिने सगळी हकीकत सांगितली. जावा आता बाप्पाला घरी घेवुन या ! पुजा करू मोदक वाट बघतायत बाप्पाची !

दोन्ही मुलांना घेऊन अण्णा दुकानात गेला. शेटजींकडे साडेआठशे रुपये देऊन मुर्ती घेतली. रॅकवर ठेवलेल्या साठ मुर्त्या मधली शेवटचीच राहीलेली कमळावर बसलेली बाप्पाची मूर्ती स्मितहास्य करीत जणू त्यांचीच वाट बघत होती.



**मुलांचा कलाविष्कार**
**आदित्य अमित मोहरीर**
**सोलापूर वर्ग-3 रा**

# पुत्रसुख...

आधुनिक केसरी

**कंडक्टरनं एस.टी.चं दार उघडलं. आणि सामंतकाका दारापाशी आले. हातात एक गोंडस बाल गणेशाची मुर्ती... कंडक्टरनं ते पाहिलं आणि काकांना आधार देत आंत घेतलं. मागून दोन पॅसेंजर चढले..! एस.टी.सुरु झाली. कंडक्टरनं ड्राईव्हरला ओरडून सांगितलं, "थांबा जरा.. गणपती मुर्ती आहे....!" त्यानं गाडी थांबवली. लोकांनी मागे वळून मुर्तीकडं पाहिलं. ते गोंडस रुप पाहून काही जणांचे हांत नकळत जोडले गेले. कंडक्टरनं शेवटी सामंतकाकांना आपल्या शेजारी बसायला सांगितलं. डबलबेल दिली. एस.टी.सुरु झाली..! कंडक्टर इतरांची तिकीटं काढून येऊन काकांपाशी बसला...!**



काकांच्या पँटच्या खिशात पैसे होते. पण मांडीवर मुर्ती असतांना त्यांना पैसे काढता येईनात तिकीटासाठी. त्याची ती धडपड पाहून कंडक्टर म्हणाला, "राहू दे काका. उतरतांना द्या. एस.टी. थांबवून माझ्या या सीटवर मुर्ती ठेऊ. तेव्हा द्या."
थोडं अंतर जाताच कंडक्टरनं विचारलं, "काका एक विचारु? तुमच्या गावात गणेशमुर्ती मिळत असेलच नं? मग दुस-या गावांतून ही घेऊन येणं ; ते ही एस.टी. च्या प्रवासाची दगदग करुन?"
सामंतकाकांनी स्मित केलं..मग म्हणाले, "आमच्या गांवात मिळतात मुर्त्या. पण अशी नाही. ही मुर्ती पाहिलीत नं? कशी गोंडस आहे? जिवंत वाटते. अगदी लहान बाळच..!" कंडक्टरनं होकारार्थी मान हलवली व अगदी अंतःकरणापासून पुन्हा हांत जोडले. हलकेच स्पर्शही केला. काका म्हणाले "आम्हा नवरा-बायकोला मूलबाळ नाही. सगळे उपाय करुन थकलो. मग प्रारब्ध म्हणून सोडून दिलं. माझी पत्नी या गावी पंधरा वर्षापूर्वी आली होती कामानिमित्त. तिनं अशी मुर्ती तिथं पाहिली अन् तिचं वात्सल्य जागं झालं जणूकाही... तिचे डोळे भरुन वाहू लागले. तोंडातून नकळत शब्द फुटले "माझं बाळ...!" हे असं घडल्यापासून. ह्या गांवातून मुर्ती नेणं हा प्रघात सुरु झाला. हिला सांधेदुखीनं आता प्रवास झेपत नाही. म्हणून मी आणतो" कंडक्टर हे ऐकून स्तिमीत झाला. थोड्यावेळानं त्यानं विचारलं "पण काका तुमच्या तिथं दाखवून घ्यायची, मोल्ड बनवून गावांत..."
"ते ही केलं पण... जास्त मुर्त्या केल्या तरच त्यांना इंटरेस्ट.. आणि असे भाव येतीलच याची शाश्वती नाही" हे संभाषण एव्हाना आजूबाजूचे ऐकत होते. एका स्त्रीनं विचारलं, "काका मग विसर्जित करायचीच नाही मुर्ती ..!" सामंतकाका फिकटसे हसले व म्हणाले, "विरहामुळं प्रेम उदंड पाझरतं तिचं..! आत्ताही दारात वाट पहात बसली असेल. रांगोळी काय, आंब्याची तोरणं काय..! भाकरतुकडा काय.., दृष्ट काढण्यासाठी ..!! त्याच्या कपड्यांची छोटी बॅग आहे. छोटा तांब्या भांडं काय..... विचारु नका.. मला तिचं ते सुख हिरावून घ्यायचं नाहीए." यांवर कुणाचे डोळे पाणावले. कुणी स्मित केले. नंतर मौन राहिलं. काकांचं गांव आलं. एका व्यक्तीनं पुढं होऊन मुर्ती हातात घेतली, म्हणाला "काका तुम्ही तिकीट काढा. तोपर्यंत धरतो मी.." काहीजण त्या मुर्तीकडं जवळून पहात राहिले. आता लोकांची नजरच बदललेली....! सामंतकाकांनी कंडक्टरला पैसे दिले "दिड तिकिट द्या. एक हाफ आणि एक फुल" कंडक्टरनं आश्चर्यानं विचारलं "दिड ? तुम्ही तर एकटेच आला आहात नं?" काकांनी स्मित केलं, "दोघं नाही का आलो? मी आणि हा बालगणेश आमचा?" हे ऐकून सगळे एकमेकांकडं पाहू लागले..!
काका म्हणाले, "असे कोड्यात का पडलांत बरें? त्याला नमस्कार केलात. त्याला आपला देव मानता.. व प्राणप्रतिष्ठेपूर्वी तो केवळ माती आहे का हो? तो आपल्यापेक्षा जास्त जिवंत नाहीए? तुमचा भाव जागृत झाला नं? आपणच त्याला मातीची मुर्ती याच भावाने भजतो; पूजतो.. अगदी पूजा केल्यावरही... पण त्याला एकाचीच गरज प्रेमाची.. आपल्या अलिंगनाची.. द्या दिड तिकिट..!" हे बोलतांना काकांचा गळा दाटून आला होता. कंडक्टरनं दिड तिकीट दिलं..! सामंतकाका जेव्हा एस.टी.तून उतरले तेव्हा एस.टी. तील प्रवाशांचे डोळे पाणावलेले व हांत जोडले गेले... अगदी अनाहूतपणे...!!

## गणेश बाप्पा

गणेश बाप्पा तुम्ही येता घरा
आनंदाने हासे घराचा उंबरा

मोदक लाडूचा नैवेद्य तुम्हाला
गोडधोड खायला मिळे आम्हाला

तुमची आरती आम्हीही रोज गातो
थोरांकडून मग शाबासकी घेतो

सगळीकडे तुमचे नाव दुमदुमे
भक्तीतच सकलांचे मन छान रमे

किती भारी वाटे बालमनाला
मोदच भरे तुमच्या या सणाला

तुम्ही घरी जाता चैतन्य जाई
परत येण्याची वाट पाहत राही

तुम्ही आम्हाला आवडता खूपखूप
रोजच आळवतो आम्ही तुमचे रूप.

**रंजना सानप**
मायणी (सातारा)




## गणपती बाप्पा...!

गणपती बाप्पा आनंदाने
लवकर या हो तुम्ही या,
ज्ञान अन् बुध्दीचा मंत्र
आम्हा लहान थोरांना दया.

या उत्साहात तुम्हा असे
ओंकार स्वरूपाचे ध्यान,
दररोज सांज-सकाळी
पुजेचा तुम्हालाच मान.

गातील तुमची आरती
शेंदरी रूप हे पाहून,
सगळ्यांना आवडे तुम्ही
आनंदाने भरते मन.

मखर आरास मांडूनी
तुम्हा आवडे मोदक भारी,
तुमच्या भेटीला आतुर
झाली भक्तमंडळी सारी.

घरेदारे सारी सजली
तुम्ही वाजत-गाजत या,
तुमची गाणी आमच्या ओठी
सुख-समृध्दी आम्हाला दया...!

**अय्युब पठाण लोहगांवकर**
मो. ९७६४३५०३७४.

## बाप्पा गणराया

बाप्पा गणराया
आता तुझे येणे
आनंदाचे गाणे
आम्हांसाठी..!

पितांबर धारी
गोड तुझे रुप
आम्हां सुखरुप
ठेव आता ..!

सुख दुःख विद्या
तुझ्याच रे हाती
आम्हांठायी प्रिती
ठेव बाप्पा ..!

पार्वतिच्या बाळा
मंगल तू मुर्ती
दिगंत रे किर्ती
वक्रतुण्डा..!

आम्ही सारे भक्त
तुझे रे गणेशा
आम्हां दे रे दिशा
विकासाची ..!!

**महादेव बी. बुरुटे,**
मो. 9765374805

# गणेशोत्सव

आधुनिक केसरी

**वर्षभर येणाऱ्या सर्व सणामध्ये एका सणाची लहानांपासून तर मोठ्यांपर्यंत अगदी आतुरतेने वाट बघितली जाते तो म्हणजे गणेशोत्सव गणपती उत्सवाच्या दोन महीने आधीपासून तयारी सुरु होते सार्वजनिक गणेश मंडळाची मूलं घरोघर वर्गणी मागत फिरतांना दिसतात, कोणी कोणी महाभाग असे असतात. त्या मुलांना वर्गणी देत नाही तर फिरवतात अरे एकशे एक रूपयांनी तुम्ही काही गरीब होणार नाहीत आणि देवासाठी पैसे द्याल तर देव तुम्हाला कधी कमी पडू देणार नाही, पुण्यात गणपतीचे स्वागत म्हणजे आधी मानाचा गणपती निघेल. त्यानंतर दूसरे गणपती येथील ढ़ोल ताशाच्या गजरात गणपतीचे स्वागत केले जाते.**

गुलालाची उधळन करून बाप्पाची स्थापना केली जाते भाद्रपद चतुर्थीस गणरायाचे आगमन होते गणेश चतुर्थी पासून सुमारे अकरा दिवस अनंत चतुर्थीपर्यंत चालणारा हा गणेशोत्सव सर्व अगदी आनंदाने साजरा करतात. 1894 मध्ये लोकमान्य टिळकांनी पुण्यातील विंचूरक़र वाड्यात गणपतीची स्थापना केली होती तेव्हा पासून गणपती उत्सवाला सुरवात झाली. सार्वजनिक गणेश मंडळ असो किंवा घराघरातील लोक सर्व अगदी श्रद्धेने आपल्या घरात गणपतीची स्थापना करतात शाडूच्या मातीपासून इकोफ्रेंडली गणपती मुर्ती सुद्धा तयार करून त्याची स्थापना करतात. कोणतेही शुभकार्य करताना प्रथम गणेशाची पूजा करतात तेव्हाच त्या कार्यस प्रारंभ केला जातो. गणेश चतुर्थीच्या दिवशी घरातील पुरुष मंडळी उपवास करतात घरातील स्त्रिया नैवेद्य म्हणून बाप्पाच्या आवडीचे मोदक बनवतात लाल फुल, दूर्वा, नारळ स्थापनेची तयारी केली जाते बाजारातून गणेश मुर्ती आणून मुहूर्ताप्रमाणे स्थापना करून मनोभावे पूजन करून आरती केली जाते सार्वजनिक गणेश मंडळाची तर खूप धूम असते, रोज रात्री गणपती जवळ पूजा-आरती सांस्कृतिक़ कार्यक्रमाचे आयोजन केले जाते विविध स्पर्धा घेतल्या जातात हे दहा दिवस निघूच नये अस वाटते, गणपती मंत्र, गाणी रोज कानावर पडतात अगदी प्रसन्न वाटते या दिवसात.

**कविता आधार चव्हाण,**
**(म्हसावद) जि. जळगाव**

# गर्विष्ठाच घर श्रीमंती

आधुनिक केसरी



कालचा एक असा प्रसंग माझ्या डोळ्यासमोर आला आपल्या बापाच्या असलेल्या पैशाच्या बळावर एक मुलगा आपल्या आलिशान गाडीतून उतरला. आणि महागडी स्कूल बॅग पाठीवर टाकुन तो शाळेत निघाला, पण त्याच वेळी शाळेच्या गेटवर गरीब वस्तीतून आलेली मुलं पायी चालून थकून-भागून आलेली मुलं या मुलाकडे बघू लागले त्यांच्या हातात होती प्लास्टिकची पिशवी तर त्या श्रीमंत मुलाकडे होती ब्रँडेड अशी स्कूल बॅग जेव्हा गरीब मुलांचा चेहरा बघितला तर खरंच वाटलं तू नको.
सांगतो श्रीमंती जेव्हा तू येतेस ना तेव्हा सोबत घेऊन येतेय ईर्षा, राग, मत्सर आणि दुसऱ्याला कमी लेखण्याची वृत्ती म्हणूनच तू मला आवडत नाही कारण तू काही सर्वांकडे नसते ९० टक्के हे तुझ्याविरुद्ध असतात आणि श्रीमंत दहा टक्के त्यांना लाजवतात त्यांना जिवंत असूनही मेल्यासारखे वाटते. म्हणूनच श्रीमंती तू मला आवडत नाही एखादा पाहुण्यांमध्ये जर एक पाहुणा श्रीमंत असला बाकी गरिब असले तर तो श्रीमंत पाहुणा ईतरांना मान सन्मान देत नाही म्हणून तू नकोच खरंच वाटतं तू नकोच कारण की जर सर्वच गरीब असेल तर कोणी कुणाला कमी लेखणार नाही आणि म्हणून श्रीमंती तू मला आवडत नाही.
बरं जाऊ दे एक गोष्ट लक्षात ठेव तुही त्रिकालबाधित नाही एक दिवस संपणार आहे.

**संदिप नानासाहेब वाकडे**
**रा.खेडा ता.कन्नड ९७६६९९२७७६**

# गणेशोत्सव पर्यावरणपूरक साजरा व्हावा

आधुनिक केसरी



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

**लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या गणेशोत्सवाचे स्वरूप, त्याचा आयाम आता पूर्णपणे बदलतो आहे.. काही अपवाद वगळता या सणाच्या उपयुक्ततेकडे दुर्लक्ष होत चालले आहे. गणेशोत्सवात सगळ्यात मोठा झालेला बदल म्हणजे गणपतीच्या प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्तींचा झालेला व्यापक शिरकाव तथा त्यातून निर्माण होत असलेल्या भयावह प्रदूषणाच्या समस्या. सोबतच पारंपरिक शाडू मातीच्या मूर्तीऐवजी प्लास्टर ऑफ पॅरिसचा वापर, सजावटीकरिता प्लास्टिकचा वापर, थर्माकोलसारख्या विघटन न होणाऱ्या साहित्याचा वापर, जास्त घातक रासायनिक रंगाचा वापर, गुलालाची अतिरेकी उधळण, या सर्वांमुळे मोठय़ा प्रमाणावर जलप्रदूषण होऊन पर्यावरणाची अपरिमित हानी होत आहे.**



कोरोनामुळे दोन वर्षानंतर गणेशउत्सव साजरा होणार असल्याने तो पर्यावरणपूरक व्हावा असा प्रयत्न आपण सर्वांनी करायला हवा. यासाठी शाडू मातीपासून बनविलेल्या मूर्तीची स्थापना करावी. आरास करण्यासाठी पर्यावरणपूरक बाबींचा वापर करावा. थर्माकोल, प्लास्टिक इत्यादी विघटन न होणाऱ्या वस्तू पदार्थांचा वापर टाळावा. गणेश मूर्तीचं विसर्जन करण्यासाठी कृत्रिम तलावांना प्राधान्य द्यावं. किंवा महापालिकेच्या गणेशमूर्ती संकलन केंद्रात मूर्ती जमा कराव्यात. घरगुती आणि सार्वजनिक उत्सवस्थळी जमा होणारं निर्माल्य कलशातच संकलित कारवं. प्रतिबंधित प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळावा. सार्वजनिक श्रीगणेशोत्सव मंडळांनी उत्सवस्थळी ध्वनिक्षेपकांचा आवाज संयमित ठेवावा. ध्वनीप्रदूषणाच्या सूचनांचं काटेकोरपणे पालन करावं. या काळात मावा, माव्यापासून तयार केलेली मिठाई आणि खाद्यपदार्थ खरेदी करताना ती शिळी आणि खवट असणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. सार्वजनिक मंडपाच्या परिसरात आग विझविण्यासाठी सहज उपलब्ध होईल अशारितीने वाळू (रेती) बादल्या व पाण्याची व्यवस्था असावी.
नैसर्गिक विसर्जनाचे ठिकाण, कृत्रिम तलावाचे ठिकाण आणि मूर्ती संकलन केंद्र या ठिकाणी उपस्थित असलेले अधिकारी/कर्मचारी यांच्याकडेच आपण आपली श्रीगणेश मूर्ती द्यावी. त्यानंतर महापालिकेतर्फे मूर्तीचं विसर्जन करावं. विसर्जनस्थळी कोणी नसले तरी आपण प्रत्येकांनी अत्यंत जबाबदारीने पर्यावरण प्रदूषित होणार नाही याची काळजी घेऊन गणेश विसर्जन करावे.

# आधी वंदु तुज मोरया...



सौ. भाग्यश्री दायमा
संपर्क क्र. 9850114339

आधुनिक केसरी

**गणपती बाप्पा मोरया, मंगल मूर्ती मोरया, असं म्हणतच आपण आपल्या गणपती बाप्पांना वाजत-गाजत, टाळ-मृदंगाच्या गजरात गणपती बाप्पांचं स्वागत करतो नंतर प्रत्येकजण आपल्या रुढी परंपरा नूसार दीड दिवसाचा गणपती ते दहा दिवस अशा पध्दतीने गणपती स्थापना करतो, चौरंगावर लाल वस्त्र ठेवून तांदुळाचे स्वस्तीक काढून कलश ठेवून गणपती बाप्पाची स्थापना करतात दुर्वा, हार, फुलं अगाडा, वस्त्र अर्पण केले जाते, लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्य काळात जनजागृती करण्यासाठी सार्वजनीक गणपती बसवण्याची सुरूवात केली, गावात आपसात एकजुटीने सर्व एकत्र येण्यासाठी त्यांनी हा उपक्रम राबवीला**

जो आजतागायत गल्लीपासून ते भले मोठमोठे मंडळ तयार झाले आहेत. तसेच गणपती बाप्पांचं आगमन झाल्यावर बऱ्याच ठिकाणी दिंड्या बोलावून गावातून बाप्पाची मिरवणूक काढली जाते, तसेच सामाजिक कार्यक्रमाचे नवनवीन उपक्रम घेतले जातात झांकी बनवून समाजामध्ये बेटी बचावो, शेतकरी बांधवांसाठी उपासमार यावर झांकी मधून चांगला संदेश देणे, होणारे अत्याचारास बळी पडणाऱ्या मूली, महागाई, यावर झांकी मधून चांगला संदेश दिला जातो अशाप्रकारे नवनवीन उपक्रम राबविले जातात.

प्रत्येक गावात आपापल्या गणपतीची एक ख्याती असते जसे नवसाला पावणारा गणपती असे प्रत्येक गावात काहीतरी नवीन आपल्या निदर्शनास येते, गणपतीबाप्पा येणार म्हणून आजकाल मूली, स्त्रीया सर्व जण ढोल, ताशा, वाजविण्याच्या स्पर्धामध्ये भाग घेताना दिसतात, यापूर्वी ढोल वाजविण्यासाठी माणसांचीच मक्तेदारी दिसत होती पण आता माणसांच्या एक पाऊल पुढे जावून लेडीज ढोल पथक बक्षिसे घेत आहेत, लेझीमचा तर थाट निराळाच असतो अशा प्रकारे सामाजिक बांधिलकी बांधत सगळे एकजुटीने एकत्र येतात घरोघरी स्त्रीया नवनवीन अलंकार परीधान करून गणपतीची रोजची आरती आटोपून मंडळाचे गणपती पाहायला जाण्याची गडबडच वेगळी असते.

शहरांमध्ये रात्रीपासून ते पहाटेपर्यंत हा उत्सव पाहण्यासाठी लोकं गर्दी करतात, प्रत्येक घरोघरी सुंदर रांगोळ्या काढल्या जातात,ज्या मुलीला भाऊ नाही ती गणपतीबाप्पाला राखी बांधून माझं रक्षण कर असे साकडे घालते, हे दहा ते अकरा दिवस घरात नवचैतन्याचे वातावरण असते. आपल्या घरी गणपती बाप्पा पाहुणे म्हणून आले आहेत प्रत्येक जण मनोभावे त्यांची पुजा, आरती, रोज नवा नैवेद्य, घंटानाद, स्तोत्र, मंत्र म्हंटली जातात. गणपती डेकोरेशन तर प्रत्येकाकडे पाहण्यासारखे असते, एक शिस्तबद्ध आपले सण आहेत, सुचीर्भूत होऊन शुद्धतेचं प्रतिक, मांगल्य, परंपरा कशा जपायच्या हे आपले सणवार आपल्याला शिस्त लावतात. नैवेद्य कसा दाखवायचा, आरती झाल्यानंतर मंत्रपुष्पांजली कशी म्हणायची, "घालीन लोटांगण वंदीन चरणं डोळ्यानं पाहीन



रूप तुझे" हे मंत्र ऐकूनच पाठ होऊन जातात, असं हे आपले गणपती बाप्पा यांच्याशी दहा दिवस घट्ट नातं होऊन जातं, जेव्हा विसर्जन करायचा दिवस उगवतो त्या दिवशी मनात आनंद आसतो पण आता गणपतीबाप्पानां निरोप द्यायचा म्हणून मन खूप हळवं होऊन जातं. गणपतीबाप्पा जवळ रोज बसून भजन किर्तन केले जाते, अशा खूप साऱ्या आठवणीने निरोप देताना कंठ दाटून येतो, पण विसर्जन हे करणं रुढी परंपरे नुसार केलेच पाहिजे.

**"गणपती बाप्पा मोरया**
**पुढच्या वर्षी लवकर या"**
**"मोरया रे बाप्पा मोरया रे"**

असे देवाचे नामस्मरण करत टाळ, गजराच्या निनादाने निरोप दिला जातो आणि प्रसाद वाटला जातो, बऱ्याच ठिकाणी मंडळ प्रसाद रुपी अन्नदान करतात, गणपतीबाप्पा सर्वांना सद्बुद्धी देवो, सर्व विघ्ने दुर करो ही ईश्वरचरणी प्रार्थना..

# महाकवी सुधाकर गायधनींच्या, स्नेहात न्हालो, त्यांच्या निर्व्याज गुणग्राहकतेने, कृतकृत्य झालो !

१८ ऑगस्ट २०१९, रोजी जळगाव येथे भरलेल्या १५ व्या सूर्योदय साहित्य संमेलनात, खान्देशातील साहित्यिकांचं मराठी साहित्यातील योगदान, या विषयावरील एका परिसंवादात मी बोलत होतो. सभागृह तुडुंब भरलेलं होतं. खान्देशातील बालकवी, बहिणाबाई, त्र्यंबक सपकाळे, ना. धो. महानोर ते आजच्या पिढीतील साहित्यिकांचं योगदान ओघवत्या शैलीत, पोटतिडकीने मांडतांना, मी देहभान विसरुन बोलत होतो. या साहित्यिकांची वैशिष्टे, त्यांच्या कवितांचे दाखले देतादेता, कधी वेळ संपली ते मलाही कळले नाही. टाळ्यांचा कडकडाट झाला. मी स्थानापन्न होणार, तोच समोर बसलेल्या मान्यवरांपैकी एक तेजपूंज व्यक्तिमत्व उभं राहिलं. अंगात काळा सदरा, मानेवर रेलणारी केसांची झुलपं. ते माझ्याकडे चालत आले. त्यांनी मला मिठीत घेतलं. व्वा, किती छान बोललात कवीराज. खान्देशचा समग्र साहित्यिक गोतावळा उभा केलात तुम्ही. कमी वेळात खूप काही बोललात. गागर मे सागर भरला. असं कुणीतरी बोललंच पाहिजे. आपला गौरव, आपलं भुषण जगजाहीर केलंच पाहिजे.! असं म्हणत त्यांनी आपल्या गळ्यातली मण्यांची माळ काढून, ती माझ्या गळ्यात घातली. मला गौरवान्वित केलं. ते महाकवी सुधाकर गायधनी होते. त्यांच्या या एका कृतीने प्रस्थापित - नवोदीतच, श्रेष्ठ-कनिष्ठ आणि परिचित-अनोळखी या भिंती गळून पडल्या. उरला तो केवळ एक स्नेहबंध. अक्षरबंध. साहित्यिक आणि रसिकाचा. गुणवंत आणि गुणग्राहकाचा. जाहीर समारंभात, आगंतूकपणे कुणाचं असं कौतुक करणं, खरंतर सहज शक्य नाही. त्यासाठी लागते ती मनाची विशालता आणि गुणग्राहकता. अती दुर्मिळ असं हे चित्र होतं. मात्र, मी ते प्रत्यक्षात अनुभवत होतो. त्यात चिंब भिजत होतो. सुधाकर गायधनींचं महाकवीपण प्रत्यक्ष अनुभवत होतो. साहित्यिक हा लिहता असावाच. मात्र, तो संवेदनशील, गुणग्राहक आणि माणूसपण जपणारा हवा. दुसऱ्यालाही ऐकणारा, मोठं म्हणणारा असावा. हा संदेश, त्यांनी सर्व साहित्य रसिकांसमोर जाहिरपणे दिला होता. मी त्यांचा रसिक तर होतोच. मात्र, त्यांच्या या कृतीने, मी त्यांचा शिष्य झालो. त्यांच्याशी जोडला गेलो. रोजच्या संपर्कात आलो. कृतीशीलता आणि कार्यप्रवणता, आजही मी त्यांच्याकडून शिकतोय.

सुधाकर गायधनी यांचा जन्म १८ सप्टेंबर १९४७ रोजी खापा (नागपूर) येथे झाला. पोष्ट खात्यात नोकरी करुन त्यांनी अक्षर वाङ्मयाची निर्मिती केली. त्यांच्या विश्व प्रसिद्ध महाकाव्य "देवदूत" महाकाव्याचा नायक एक अक्राळविक्राळ महापक्षी आहे. जो महावृध्दावस्थेला जातो. त्याच्या पुढील पिढीतील वारसदारांशी त्याने साधलेला संवाद म्हणजे हे महाकाव्य. ईश्वर संकल्पनेची भेट, विश्वचित्त निर्मिकाचा साक्षात्कार, निर्मिती आणि विनाश यांच्या रहस्याचे सूत्र, विश्वसंवेदनाची प्राप्ती आणि मोक्ष याचं रहस्य त्यातून उलगडते. तर "योगिनीच्या स्वप्न सावल्या" या दीर्घ काव्यातून योगिनींच्या कामतपातील समाधी व मोक्षपद प्राप्तीचा शोध घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. या दोन्ही ग्रंथांबाबत अनेक प्रकारची साधक-बाधक चर्चा झाली आहे. मात्र, गायधनी त्यात अडकून पडत नाहीत. ते म्हणतात की साहित्यिकाने साहित्य निर्मिती करुन स्वतःला त्यापासून दूर करुन घ्यायला हवे. रसिक त्याची मीमांसा करतील. जे अस्सल असेल, खरे असेल तेच साहित्य काळाच्या कसोटीवर खरे उतरेल आणि अक्षय होवून जगात दिमाखात वावरेल. साहित्याची इतकी परखड संभावना फार थोड्या लोकांना करता येते. त्यात गायधनींचा समावेश करतांना मला आनंद होत आहे.

त्यांच्या मते तोच थोर कवी आहे जो नेणिवेच्या अथंग खोल डोहात तळाशी जावून नवनविन प्रतिमा पकडतो. त्यासाठी स्वतःचे कसब लावतो. ज्याला या प्रतिमा पकडण्याचे सामर्थ्य लाभते त्याची प्रतिभा कसदार, दर्जेदार, कालनिरपेक्ष अश्या थोर कलाकृतीची निर्मिती करते. अन्यथा असंबद्ध, निर्बोध कलाकृती निर्माण होण्याचा धोका असतो. ही त्यांची धारणा. गायधनींनी महत्प्रयासाने नेणिवेच्या खोल डोहात तळाशी जावून आपल्या स्वतःच्या प्रतिमा आणि शब्दांची निर्मिती केली आहे. म्हणून त्यांची साहित्य निर्मिती सामान्य न राहता असामान्यतेच्या पातळीवर पोहचलीअसून ती जागतीक झाली आहे. थोर झाली आहे.

महाकाव्य म्हणून ज्याची मान्यवरांनी नोंद घेतली ते त्यांचे "देवदूत"

आधुनिक केसरी




**वैश्विक साहित्य पटलावर सध्या, जे एक नाव दिमाखाने चमकत आहे, ते महाकवी सुधाकर गायधनी यांची, सिंगापूर सरकारने, फेडरेशन ऑफ वर्ल्ड कल्चर अॅड आर्ट सोसायटीच्या, विश्व मानद सल्लागारपदी नियुक्ती केली आहे. मराठी साहित्याचा हा एक गौरवच आहे. साहित्याचा क्षेत्रात काव्य, दीर्घ काव्याची निर्मिती खूप झाली. मात्र, एका हाताच्या बोटावर मोजता येतील एव्हढीच महाकाव्य लिहली गेलीत. त्यात विदर्भातील सुधाकर गायधनी यांचा समावेश होतो. त्यांची कर्मभूमी ही खान्देश राहिली आहे. पोष्ट खात्यात २२ वर्षे काम करतांना गायधनींनी जळगाव जिल्ह्यात काही वर्ष सेवा केली आहे. खान्देशशी नाळ जुळलेला आहे. आपल्या हयातीत आपल्या नांवाने उद्यानाची निर्मिती, आपल्या जन्मघराचे शासनाद्वारे जतन पाहण्याचे आणि देश-विदेशात अनेक मानसन्मान मिळण्याचे भाग्य लाभणारा हा कवी, आजही जमिनीवरच आहे. कारण, त्याने स्वार्थी जगाचे अंतरंग खूप जवळून पाहिले आहेत. ते म्हणतात,आम्ही चिंध्या पांघरुन/ सोनं विकायला बसलो / गिऱ्हाईक कसं ते फिरकेना / मग सोनं पांघरुन / चिंध्या विकायला बसलो / गर्दी पेलवता पेलवेना. बेगडी प्रदर्शनाला जग भूलतं, हे खरं असलं तरी, गायधनी अस्सल सोन्यालाच महत्त्व देतात. आपल्या साहित्याने वैश्विक पटल अधोरेखीत करुन, नोबेल पुरस्काराकडे दमदार वाटचाल करणारा, हा महाकवी, मला जळगावात प्रत्यक्ष भेटला. माझ्या कवितेने, वक्तृत्वाने प्रभावीत होवून, त्यांनी माझा जाहीर सत्कार केला. त्यांच्या या गुणग्राहकतेने माझ्या जीवनातला एक क्षण, अत्तरक्षण झाला. तो दरवळ माझं अवझं जगणं सुगंधी करुन, माझ्या अवतीभोवती फेर धरुन आहे. मला आजही आपल्या ऋणानूबंधात बांधून आहे.**




महाकवी सुधाकर गायधनी यांच्या हातून गौरव स्विकारतांना प्रा.बी.एन.चौधरी.

आपण विश्वविक्रमासाठी लिहलेली नाही असं ते सांगतात. ही कविता नऊ वृत्तींची चित्तयात्रा आहे. ९७५१ ओळीतून ती झिरपत गेली. मेघमालांचा कथामार्गाने जात एका संतुष्टबिंदूवर ती विसावलेली आहे. विश्रांत झाली आहे. गायधनी यांच्या नांवावर विपूल साहित्य संपदा आहे. कब्रीतला समाधिस्थ (१९७३) कविता संग्रह. याचा इन ट्रान्स इन द टोंम्ब हा इंग्रजी अनुवाद प्रसिद्ध झाला आहे. देवदूत (१९८१) महाव्य. याचे देवदूत द एंजेल हे इंग्रजी अनुवाद आणि हिंदी, रशियन अनुवाद आले आहेत. मोकाट ग्रहांचा फकीर (१९९९), गोफण गोटा (२००२), महावाक्य - समग्र देवदूत (२००४), अभंग तुका-मृदुंग विठ्ठल (२००९) यात एकूण ८६० अभंग आहेत. मृगजळ आणि ओंजळ (२०१३), योगिनीच्या स्वप्न सावल्या (२०१६) यात ८ सर्गात २७० पानांची एक दीर्घ कविता आहे.

गायधनींच्या साहित्याची रसिक वाचक आणि अभ्यासू समिक्षकांनी उत्स्फूर्त दखल घेतली आहे. त्यांच्या देवदूतला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट साहित्य निर्मितीचा राज्य पुरस्कार, साहित्य अकादमीची प्रवासवृत्ती, भारत सरकारची सांस्कृतिक फेलोशिप मिळाली आहे. कवितेचा प्रतिनिधी म्हणून अमेरीका, जेरुसेलमची वारी, विद्यावाचस्पती पुरस्कार, देवदूतची जागतीक १०० साहित्यकृतीत निवड तसेच युनेस्कोच्या जागतीक लिस्टीत समावेश. ही त्यांच्या साहित्यावर रसिक मान्यतेची उमटलेली मोहरच आहे.

गायधनी यांनी आपल्या लेखनात खाजगी अनुभवांचा, आस्थांचा गैरवापर केलेला नाही. त्यांची कविता ही सामाजिक तपशिलांची, दर्शनाची कविता असून ती सामाजिक प्रबोधन अथवा कर्तव्यन्मुखतेचा घोषा लावत नाही असं ते नमूद करतात. ही कविता स्थल, काळाच्या विळख्यातून स्वतःला मुक्त करते आणि स्थळ-कालात्मक अनुभवांचा रसमय प्रत्यय देते. थेट गाभ्यालाच हात घालते. द. भि कुलकर्णी गायधनींना वाच्यार्थाला न हिणवणारे, प्रतिमांची व्यवस्था साधणारे लेखक मानतात. त्यांचं लेखन हे समाजाचे लौकीक हत्यार नसून समाजाची व्यथा मांडणारे साहित्य आहे असं मानतात. ही कविता फक्त मीची, समाजाची, वेदनेची, निसर्गाची कविता रहात नाही तर या साऱ्यांमधील मुलभूत संबंधाची कविता बनते असं ते नमूद करतात. स्वतः गायधनी आपल्या कवितेचं वेगळंपण सांगतांना म्हणतात "माझी कविता शब्दांची लेकुरं कुशीत घेवून, निर्वासितांच्या छावणीत एकटीच बसली आहे." यातून त्यांचे शब्दांवरील लेकरांसारखे प्रेम व्यक्त होते. त्याच सोबत, त्यांच्या कवितेची व्यथाही जगासमोर येते. त्यांच्या कवितेत अनुकरण, सांकैतीक प्रणय निष्ठा, फॅशनेबल हताश विचार दिसून येत नाहीत. अनुभवांचे सुलभिकरण, विस्तृतीकरण या वैगुण्यापासूनही ती कोसोदूर आहे. द. भि. कुलकर्णी यांच्यामते गायधनी भावानुवर्ती कविता लिहतात. त्यातील आशावाद हा सुटा, समारोपात्मक, उपरा वाटत नाही. तो संपूर्ण अनुभूतीशी एकघन झालेला तसेच मुल्यगर्भ वाटतो. हीच गायधनींच्या कवितेची शक्तीस्थळं आहेत, जी त्यांच्या कवितेला श्रीमंत करते.

जिवनात कलेला महत्वाचं स्थान आहे. उपयुक्त कला ही जिवन जगण्यासाठी उपयोगात येते. तर ललित कला जगणं सुंदर करते. कलावंत हेही दोन प्रकारचे असतात. कार्मिक आणि निर्मिक. कार्मिक म्हणजे कारागिर हा जगण्यासाठी उपयुक्त साधनं तयार करतो. तर निर्मिक हा उपयुक्तेत कलात्मक सौदर्य सुंदर मिलाफ घडवून आणतो. निर्माण करतो. ज्यात सत्य-शिव आणि सुंदरतेचे दर्शन घडते. त्रिगुणाच्या या विश्वात्मक सौदर्याभिव्यक्तीमुळेच रसिकाला आनंदाची प्राप्ती होते. म्हणून लेखक-कवींनी कार्मिक होत भाराभर साहित्य निर्मिती करण्यापेक्षा, रसिकाला आत्मानुभूती देणारी, अंतर्मुख करणारी, अक्षय आनंद देणारी साहित्यकृती निर्माण करुन निर्मिक व्हायला हवे. महाकवी सुधाकर गायधनी या वाटेवरचाच अक्षय शब्द यात्री आहे असे मला वाटते.

कोलंबिया सरकारने त्यांना जगातील सर्वाधिक वाचकप्रिय कवी हा सन्मान, बांगला देशाने त्यांना विश्व समकालीन कवी हा सन्मान, पेरुने गोल्डन पेन सन्मान, ईस्त्रायलने पीस अम्बेसॅडर, मांगोलियाने मानद डॉक्टरेट, नायजेरीयाने ह्युमेनिटेरीयन गुडविल अम्बेसॅडर सन्मानाने गौरविले आहे. त्यांच्या साहित्याचे स्पॅनिश, जर्मनी, इटालियन, रोमियन, अरेबियन, मेस्किको, लेदरलॅड, ग्रीक आदी ३४ भाषात अनुवाद झाला आहे. ही गायधनी यांची नोबेल पुरस्काराकडची वाटचाल आहे. एखाद्या मराठी साहित्यिकाने अशी विश्व गवसणी घालणं अचंबित करणारं आणि अभिमानास्पद आहे. ते म्हणतात, आपलं जगणं हे फुलासारखं हवं. जे स्वत्व गमावून इतरांना, आपला फक्त सुगंध देत राहील, त्याचवेळी ते अत्तरासारखंही व्हावं, जे केवळ सुगंधाचीच उधळण करेल.

माणूस असे जगावे,
की बागेतल्या फुलांचे
कुणी गजरे, कुणी हार व्हावे.
माणूस असे खल्लास होत जावे,
की जसे हळूहळू
कुपीतले अत्तर उडत जावे.

महाकवी सुधाकरगायधनी ( ९८२२६ ९५७३६) यांचं हे मागणं ज्ञानेश्वर माऊलींच्या पासायदानाशी थेट नातं सांगणारं आहे. जग जोडणारं आहे. त्यांच्याशी संवादाचा माझा बंध अक्षर आहे, हीच माझी श्रीमंती.

# संत ज्ञानेश्वर उद्यानासाठी भरीव निधी उपलब्ध करून देऊ : मंत्री भुमरे

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** संत ज्ञानेश्वर महाराजाच्या नावाने प्रतिष्ठान नगरीत मैसुरच्या वृंदावन गार्डनचे प्रतिकात्मक रुपडे म्हणून जवळपास तिनशे एकरावर उद्यान उभारले गेले होते, त्याच उद्यानाचे आत जंगल झाले. पैठण येथील उद्यान आजच्या स्थितीत फुलांच्या जागी वेड्याबाभळीन व्यापलं असून अत्यंत भकास स्वरूप आले आहे. नुसत्या साफसफाई अभावी मागील सहा वर्षापासून उद्यान बंद आहे. उद्यानाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्यानं उद्यान म्हणजे जनावरे चरण्याचं ठिकाण झालं आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी पैठण कर एकत्र येवून उद्यानात फुलांची झाडे लावली होती परंतु कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे झाडे जळुन गेले. लहान मुलांची खेळणी आता पुर्णपणे गंजली असून रस्ते पुर्ण काटेरी झुडपानी भरले आहेत. अनेक वर्षापासून पाटबंधारे विभागाच्या ताब्यात हे उद्यान आहे. संदिपान भुमरे यांनी या उद्यानाच्या विकासासाठी विशेष प्रयत्न सुरू केले आहेत. त्याला बराच कालावधी लागणार असल्याने सध्या निदान उद्यान सुरु करण्यासाठी काही कोटीचा निधी उपलब्ध करून दिला तर उद्यान साफसफाई करून चालु होवु शकते, अशी मागणी पैठणकर नागरिकांची आहे.

**संगीत कारंजेसह बच्चे कंपनीसाठी खेळणी पर्यटक केंद्रबिंदू मानून उद्यानामध्ये अत्याधुनिक सुविधा देण्यासाठी प्रयत्न सुरू आहे. यामध्ये परिसरात विविध फुलांची झाडे, संगीत कारंजे, वॉटर पार्क, रोपवे, बोटिंग, हॉटेलिंग, रिसॉर्ट, योगा सेंटर, थिएटर, संत सृष्टी, लहान मुलांसाठी खेळणी, मिनी ट्रेन, मत्स्यालय आदी सुविधांचा आराखड्यात समावेश आहे.**



शनिवारी रोजगार हमी मंत्री संदिपान भुमरे यांनी संत ज्ञानेश्वर उद्यानाची पाहणी केली. यावेळी महाराष्ट्र राज्य जलक्रांती ग्रुप च्या वतीने संत ज्ञानेश्वर उद्यानाचा तयार करण्यात आलेल्या विकास आराखड्यावर चर्चा करण्यात आली. यावेळी डॉ. अवसरमल यांनी विकास आराखडा संदर्भात उपस्थित त्यांना माहिती दिली. यावेळी पाटबंधारे विभागाचे अधिकारी, मी पैठणकर या सामाजिक ग्रुपचे पदाधिकारी, उद्यान दबाव गटाचे पदाधिकारी, पवन लोहिया, प्रा.संतोष तांबे, उद्यान विकास समितीचे पदाधिकारी व्यापारी संघटनेचे पदाधिकारी, तसेच राजकीय पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

वृंदावन, शालिमारच्या धर्तीवर निर्मिती पैठण येथे नाथसागर जायकवाडी धरणाची निर्मिती झाल्यानंतर तालुक्याची आर्थिक घडी बळकट करून, पर्यटकांच्या माध्यमातून व्यापाराला चालना मिळावी म्हणून जलसंपदा विभागाने म्हैसूरच्या वृंदावन आणि काश्मीरच्या शालिमार उद्यानाच्या धर्तीवर सन १९८३ मध्ये ३१० एकरवर संत ज्ञानेश्वर उद्यानाची निर्मिती केली. परंतु उद्यान आता कॉम्पँक्ट झाले. सध्या उद्यानाची दुरावस्था झाली आहे. उद्यानाला बघण्यासाठी देशभरातील पर्यटक या ठिकाणी येत होते. मात्र मागील सात ते आठ वर्षांपासून उद्यानाची भग्न अवस्था झाली. पाटबंधारे विभागाच्या गलथान कारभारामुळे उतरती कळा लागली.



**गेल्या सहा वर्षांपासून संत ज्ञानेश्वर उद्यान बंद आहे. प्रशासनाने या उद्यानाचा लवकरच पुनर्वसन करावे जेणे करून लवकर पर्यटकांना पहिल्या टप्प्यात उद्यान खुले होईल. संत ज्ञानेश्वर उद्यानातील संगीत कारंजे सुरू करून उद्यानात पुन्हा पर्यटकांची गर्दी झाल्यास पैठण शहराच्या बाजारपेठेत ही मदत होईल.**

**पवन लोहिया, अध्यक्ष पैठण शहर व्यापारी महासंघ**



**मराठवाड्याचे नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राचे एकेकाळी मुख्य पर्यटनस्थळ असलेले व देशात क्षेत्रफळाने सर्वात मोठे असलेले संत ज्ञानेश्वर उद्यान हे परत राष्ट्रीय पातळीवरील महत्वाचे पर्यटन केंद्र व्हावे यासाठी नवीन आराखड्यात भविष्याचा वेध धरून सुधारणा सुचवल्या आहेत. उद्यानाची नव्याने उभारणी करत असताना दर्जेदार व दीर्घकाळ टिकतील अशी कामे व्हावीत.**

**प्रा.संतोष गव्हाणे**




# ऊर्जा कार्यक्षम प्रकल्पांच्या वित्तपुरवठ्यासाठी गुंतवणूक बाजार याविषयी एकदिवसीय परिषद

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** एनर्जी एफिशिअन्सी फायनान्सिंग प्लॅटफॉर्म (EEFP) हा उपक्रम ऊर्जा कार्यक्षम प्रकल्पांना वित्त पुरवठ्यास चालना देण्यासाठी नॅशनल मिशन फॉर एनहांन्स्ड एनर्जी एफिशिअन्सी (NMEEE) अंतर्गत उपक्रमांपैकी एक आहे. एनर्जी एफिशिअन्सी फायनान्सिंग प्लॅटफॉर्म अंतर्गत ऊर्जा कार्यक्षम प्रकल्पांना वित्तपुरवठा करण्यासाठी तसेच अशा प्रकल्पांच्या वित्तीय पुरवठ्यातील अडथळे दूर करण्यासाठी ऊर्जा दक्षता ब्युरो, नवी दिल्ली व महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) यांच्या संयुक्त विद्यमाने "ऊर्जा कार्यक्षम प्रकल्पांच्या वित्तपुरवठ्यासाठी गुंतवणूक बाजार" या एकदिवसीय परिषदेचे दि.26 ऑगस्ट 2022 रोजी हॉटेल फोरपॉइंट, पुणे येथे आयोजन करण्यात आले होते.

रविंद्र जगताप, महासंचालक, महाऊर्जा, सूरज वाघमारे, अपर महासंचालक, महाऊर्जा, सुनिल खंदारे, संचालक, ऊर्जा दक्षता ब्युरो, श्रीमती सुवर्णा हुंडेकरी, महाव्यवस्थापक, महाऊर्जा, अमित चिलवे, व्यवस्थापक, महाऊर्जा व अभिजीत हिंगे, प्रकल्प कार्यकारी अधिकारी, महाऊर्जा यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन करण्यात आले.

या परिषदेमध्ये विविध उद्योग जसे की, फोर्जिंग, ऑटोमोबाईल, फॉन्ड्री, टेक्सटाईल, स्टील उद्योग इ., ऊर्जा कार्यक्षम उपकरणांचे उत्पादक, वित्तीय संस्था/बँका, पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन व ऊर्जा परीक्षक यांचे प्रतिनिधी यांनी या परिषदेमध्ये सहभाग नोंदविला. तसेच काही उत्पादकांकडून त्यांच्या ऊर्जा कार्यक्षम उत्पादनाविषयी माहिती देण्याकरीता व विविध बँकाद्वारे वित्त पुरवठाबाबत योजनांची माहिती देण्याकरीता स्टॉल उभारण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी सुनिल खंदारे, संचालक, ऊर्जा दक्षता ब्युरो यांनी सर्वांना संबोधित केले की, हवामान बदल हे सर्व राष्ट्रांपुढील सर्वात मोठे आव्हान आहे आणि भारताने 2030 पर्यंत एकूण अनुमानित कार्बन उत्सर्जन एक अब्ज टनांनी कमी करण्यासाठी आणि 2070 पर्यंत नेट झिरोचे उद्दिष्ट पूर्ण होण्यासाठी वचनबद्ध आहे. त्यादृष्टीने वाटचाल करण्याकरीता राज्यातील विविध औद्योगिक क्षेत्रांमध्ये ऊर्जा संवर्धनाचा वाव लक्षात घेऊन तसेच नवीन तंत्रज्ञानावर आधारित बाजारामध्ये उपलब्ध ऊर्जा कार्यक्षम संयंत्रे पाहता या क्षेत्रामध्ये ऊर्जा संवर्धन व ऊर्जा कार्यक्षमतेबाबत विशेष काम करता येऊ शकेल. याकरीता विविध वित्तीय योजनेव्दारे ऊर्जा कार्यक्षम प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी ऊर्जा दक्षता ब्युरो उत्सुक आहे.

या परिषदेला संबोधित करताना जगताप यांनी दुजोरा दिला की, अशा प्रकारच्या परिषदेच्या आयोजनामुळे सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांमध्ये ऊर्जा संवर्धनाबाबत जनजागृती निर्माण होईल. भारत सरकारच्या या लक्ष्यासह, महाऊर्जादेखील राज्यात ऊर्जा संवर्धनास प्रोत्साहन देण्यासाठी तसेच अपारंपरिक ऊर्जेच्या वापरास वचनबद्ध आहे. जगताप यांनी या एकदिवसीय परिषदेमध्ये सक्रिय सहभाग घेतल्याबद्दल सर्व उपस्थितांचे आभार मानले आणि भारताला अधिक ऊर्जा कार्यक्षम बनवण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन सहकार्य करण्याची विनंती केली.

# बनावट लग्न लावून फसवणूक करणाऱ्या टोळीतील पाचवा आरोपी अखेर गजाआड

आधुनिक केसरी न्यूज



बनावट लग्न फसवणूक प्रकरणाचा तपास अजूनही गुलदस्त्यातच

आधुनिक केसरी न्यूज

कचनेर : पैठण तालुक्यातील बालानगर येथील एका शेतकरी तरुणासोबत बनावट लग्न करून दोन लाख रुपये लुबाडूक करणारे त्या फरारी आहेत. बनावट नवरी सोबत लग्न लावून देणारे टोळीतील प्रमुख आरोपी घरापासून फरारी असून आरोपी मोकाट फिरत असल्याने पोलिसाकडून हे प्रकरण गुलदस्त्यात ठेवण्यात आले की काय अशी चर्चा तालुक्यात जोर धरत आहे.

पैठण तालुक्यातील बालनगर येथील नाना रानुजी गोडे शेतकऱ्याचा विश्वास संपादन करीत जालना जिल्ह्यातील एकाने आपल्या मुलासाठी आमच्याकडे चांगले स्थळ आहे आपण दोन लाख रुपये दिल्यास आम्ही तुमच्या मुलीचे लग्न लावून देऊ असे सांगत शपथपत्रावर त्याबाबत कराराही करून दिला. त्यानंतर पैठण येथील एक मंगल कार्यालयात नाना गोडे यांनी सर्व खर्च करीत दिनांक २० जुलै रोजी मुलाचे लग्न निकिता सखाराम गोळे या मुली सोबत लावून दिले. माझं लग्नाच्या तिसऱ्या दिवशी नवरीच्या संशयास्पद हालचालीमुळे नवरदेव मुलाला संशय आला. कुटुंबीयांना सांगत आपली फसवणूक झालेचे निदर्शनास आणून दिले. त्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉक्टर विशाल नेहूल यांना माहिती देण्यात आली. या प्रकरणाचा तपास पैठणचे पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी केला. चौकशीत निकिता सखाराम गोळे (रा. काजळा ता. जि.जालना) ही विवाहित असून तिला एक मुलगा असल्याचे स्पष्ट झाले.

मुलांच्या वडीला कडून दोन लाख रुपये घेऊन बनावट लग्न लावून दिल्या प्रकरणी टोळीतील गणेश शंकर गाडेकर (रा.सुपारी हनुमान औरंगाबाद), शिवाजी भागोजी धनेधर (रा. रामनगर औरंगाबाद), गणेश सखाराम गोळे (रा.काजळा जालना), शेख पाशा (पूर्ण नाव व पत्ता नाही) यांच्यासह बनावट नवरी निकिता गोळे च्या विरोधात गुन्हा दाखल करीत पोलिसांनी त्यांना अटक केली होती. परंतु या टोळीतील फसवणूक करणारे चार प्रमुख वऱ्हाडी मंडळी महिनाभरापासून फरारी असून पैठणचे पोलीस उपनिरीक्षक तपास करीत आहेत. दरम्यान सदरील बनावट लग्न प्रकरणाचा तपास गुलदस्त्यात ठेवण्यात आला का अशी चर्चा तालुक्यात होत आहे.

**कचनेर :** पैठण तालुक्यातील बालानगर येथील एका शेतकऱ्याच्या मुलाकडून महिनाभरापूर्वी दोन लाख रुपये लुबाडून बनावट लग्न लावून देणाऱ्या वऱ्हाडी मंडळीतील तोतया मामास पोलिसांनी अटक केली आहे. बनावट लग्न प्रकरणाचा तपास महिनाभरापासून सुरू असताना फरारी आरोपी मोकाट फिरत असल्याचे वृत्त आधुनिक केसरी मध्ये प्रसिद्ध होताच उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल, निरीक्षक किशोर पवार यांनी तात्काळ दखल घेत बनावट वऱ्हाडी मंडळातील फरारी तोतया मामाला गजाआड केले.



बनावट वऱ्हाडी मंडळींनी बालानगर येथील शेतकरी नाना रानुजी गोंडे यांच्याकडून दोन लाख रुपये घेऊन त्यांच्या मुलाचे काजळा येथील गीता सखाराम मुळे हिच्यासोबत लग्न लावून दिले होते. देश म्हणजे निकिताचे पहिले लग्न झाले असून तिला मुलगा असतानाही ते बनावट लग्न लावून देण्यात आले होते. लग्नाच्या तिसऱ्याच दिवशी नवरी व तिच्यासोबतचे नातेवाईक तोतया असल्याचे निदर्शनास येतात गोंडे कुटुंबाला धक्काच बसला. प्रकरणी महिनाभरापूर्वी पैठण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर यांच्याकडे बनावट लग्न लावून फसवणूक केल्याची तक्रार करण्यात आली होती. तक्रारीवरून बनावट नवरीवर कारवाई करून टोळीतील शेख पाशा, गणेश घोडेकर यांच्यासह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपास पोलीस उपनिरीक्षक दशरथ गुरुकुल यांच्याकडे वर्ग करण्यात आला होता. तो फसवणूक करणाऱ्या वऱ्हाडी मंडळींना अटक न झाल्यामुळे तक्रारदार यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहूल, पोलीस निरीक्षक किशोर पवार यांची भेट घेऊन आरोपींना अटक करण्याच्या मागणीसाठी निवेदन दिले होते.

**बनवेगिरी : बालानगर येथील तरुणांकडून दोन लाख रुपये घेऊन लावले होते लग्न**

रविवारी दि.28 रोजी सायंकाळी तपास अधिकारी दशरथ बुरकुले, महेश माळी, मुकुंद नाईक, हर्षल वाघ यांनी बनावट लावून देणाऱ्या टोळीतील तोताया मामा शिवाजी भागाजी धनेधर (रा.क्रांतीनगर, रामनगर औरंगाबाद) यास आज अटक केली. यापूर्वी तीन जणांवर कारवाई झाली असून एकाने अटकपुर्व जामीन मिळवला आहे.




# सावळदबारा येथील राष्ट्रवादी युवक अध्यक्ष पदी मो.आरिफ मो.लुखमान यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे सोयगाव तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीची बैठक संपन्न झाली. या बैठकीत सोयगाव तालुका रा.युवक अध्यक्षपदी मो.आरिफ मो.लुखमान यांना जिल्हाध्यक्ष कैलास पाटील चिकटगावकर, भाऊसाहेब तळमळे पाटील व रंगनाथ काळे यांच्या हस्ते प्रणामपत्र देण्यात येऊन त्यांचे निवडीबद्दल अभिनंदन करण्यात आले.

फर्दापूर येथे जिल्हाध्यक्ष कैलास पाटिल व जिल्यातील प्रमुख पदाधिकारी, मान्यवर यांच्या उपस्थितीत युवक तालुका अध्यक्ष निवडीचे पत्र दिले.

फर्दापूर येथे होणाऱ्या तालुकास्तरीय होणाऱ्या या आढावा बैठकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीची आगामी होणाऱ्या जिल्हापरिषद व पंचायत समीती निवडणूक बाबत चर्चा करण्यात आली व या निवडणुकीत शिवसेना व कॉंग्रेस सोबत युती करायची किंवा नाही याबाबत कार्यकर्त्यांचे मत जाणून घेण्यात आले. इच्छुक उमेदवारांशी चर्चा करण्यात आली व कार्यकर्त्यांना प्रमुख नेते यांनी मार्गदर्शन करण्यात आले.



याप्रसंगी महिला आघाडीचे जि.अध्यक्ष छायाताई जगंले, डॉ. इंद्रजीत सोळंके, चुनीलाल चव्हाण, राजेंद्र आहिरे, प्रा. जीवन कोलते, रवी काळे, नंदुभाऊ सोळंके, करीम देशमुख, अनिस तडवी, पंजाबराव देशमुख, रवींद्र गायकवाड, वसंत चोरमारे, शंकर खराटे, संदीप सुर्यवंशी, सुनील शिप्पलकर, रज्जू तडवी, निसार भाई, जमत गावंडे, शेख शफीभाई, रईस शेख, प्रेम तायडे मान्यवरांनी निवडीबद्दलच्या शुभेच्छा दिल्या.

# पत्रकाराच्या घरावर वीस ते पंचवीस लोकांचा प्राणघातक हल्ला

## पिशोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल मात्र आरोपी अद्याप मोकाट






आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** कन्नड तालुक्यातील पिशोर गावातील ज्येष्ठ पत्रकार सय्यद आरेफ़ यांच्या घरावर हल्ला करीत दगडफेक केल्याची घटना शुक्रवारी सायंकाळी घडली.

या घटनेची सविस्तर माहिती अशी आहे की, घरात शेजारील रहिवासी शेख शफीक उर्फ अन्ना व त्याची पत्नी रईसा बी शेख यांनी पत्रकार सय्यद यांच्या घरासमोर पत्रा केला पत्रा कारण नसताना वाकवला, त्यावर माझी पत्नी फरिदा बी व रईसा यांच्या आपापसात बोला- बोली झाली. मी व गावातील जुम्मा खा यांनी दोघांना समज देत हा तंटा मध्यस्थीने जागेवर येऊन मिटवला. त्यानंतर माझा लहान मुलगा सय्यद शोहेब हा जामा मजीदमध्ये सायंकाळी सात वाजेच्या नामाजासाठी गेला. नमाज पठन करून तो घरी आला व त्याने दरवाजा केवळ लोटला होता त्याचा पाठलाग करून वीस ते पंचवीस लोक घरात घुसले व आत येऊन मुलाला बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यांचे नाव शेख शफीक उर्फ अन्ना यांच्यासोबत अन्य 25 ते 28 लोक घुसले. त्यांनी मुलगा सय्यद शोहेब यास लाथा बुक्क्याने, काठीने, लोखंडी रॉड व दगडफेक करून मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यापैकी शेख शफीक अन्ना व त्याचा भाऊ अतीक यांनी माझ्या पत्नीला केस ओढून मारहाण करून गळ्यातील सेवनपीसवर त्यांची नजर फिरली. त्यांनी सेवनपीस हिसकावून नेले व वाईट हेतुने निर्लज्ज कृत्य केले. शोहेबला याच घरात मारत मारत ओढून नेले व बाहेर उभे असलेले जमावत टाकले. त्या जमावांनी त्याला पण लाठ्या काठयाने मारहाण करण्यास सुरुवात केली. इतकं पाहून मी मध्यस्थी करत असताना त्यांनी मालाही लाथाबुक्क्यांनी डोक्यावर मारहाण केली. त्याचवेळी माझा मुलगा शोहेब यास घरात ओढून यांनी त्यांच्या हातातील लोखंडी गज, लाठ्या काठयाने त्याच्या डोक्यावर हाता-पायावर मारहाण करण्यास सुरुवात केली व आम्हाला धमकी दिली. सर्व कुटुंबाला मारुन टाकल्याशिवाय शांत बसणार नाही, हीच वेळ आहे पोलिस आपल्या पाठीशी आहे, तुमच्यावर जर खोटे गुन्हे दाखल नाही केले तर मी नावाचा अन्ना नाही, अशी धमकी देण्यास सुरवात केली.

त्यावेळी गल्लीतील शेख कैसर ईस्माईल, अमजत फिरोज़ खा, जावेद शेख यांनी या भांडणात मध्यस्थी केली. त्यानंतर मी, माझी पत्नी व मुलगा पोलीस ठाणे येथे गेलो यांनी मेडिकल मेमो घेऊन उपचार करण्यासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठवले. त्यांना परिस्थिती गंभीर दिसल्याने अधिक उपचार मिळवण्यासाठी त्यांनी मुलाला, पत्नीला औरंगाबाद येथे रेफर व त्यांनी तिथे दोन दिवस उपचार घेतले. संबंधित व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे तसेच पोलिस तपासात अजुन नाव निर्देशनात आले तर कार्यवाही होणार असल्याची माहिती मिळत आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक श्रीमती कोमल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बिट अमलदार किरण गंडे करीत आहे.

**अतिक्रमणामुळे वादाला दंगलचे स्वरूप; ग्रामपंचायतने आतापर्यंत का केली नाही अतिक्रमणावर कारवाई?**

कसबा गल्ली भागातील पत्रकार सय्यद यांचे गल्लीत सध्याला ही भल्या मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. शासन दरबारी आठ ते दहा फुटाची गल्ली सध्याला तीन ते चार फुटावरून पडली आहे. एकीकडे या गल्लीतून दोन बैलगाडे एकसोबत जायचे आता सध्याला एक मोटरसायकल जायलाही मुश्किल झाली आहे. राहिलेलं चार फुटावर गल्लीवरही संबंधित त्यांनी विनाकारण न उपयोगी येणारे वस्तू अडचण करून ठेवले आहे. काहींनी अक्षरशः घरातील डबे, तुटलेल्या फरश्या त्यासोबत पाण्याचे डबे, दिवसेंदिवस पायऱ्या पुढे -पुढे करत गल्ली एकदम छोटी करून टाकलेली आहे. सध्याच्या स्थितीला "गल्लीत रस्ता की रस्त्यात गल्ली" अशी परिस्थिती करून टाकली आहे तसेच या गल्लीत विश्वासू सूत्राच्या आधारे माहिती मिळाली आहे की, राजकीय लोकांचा वावर जास्त आहे. त्यामुळे येथील अतिक्रमण काढणार तर कोण काढणार? अशी परिस्थिती झाली आहे. पिशोर या गावाची लोकसंख्या जास्त असल्या करणाने तालुक्यात लोकसंख्यांच्या बाबतीत अव्वल मानला जातो. बहुतांश जागी सिमेंट कॉन्क्रीटचे रस्ते बनले आहे, मात्र पत्रकार सय्यद यांच्या गल्लीत स्वतंत्रतापासून अद्याप रस्ता बनला नाही? याचा गैरफायदा घेत लोकांनी अडमाप अतिक्रमण करून घेतले आहे. संबंधित प्रकरण जनतेच्या समोर आल्याने ग्रामपंचायत तत्काळ काय कार्यवाही करणार का नाही ? याकडे सर्वांचे लक्ष आहे.

# योगेश्वरी महाविद्यालयात रेडरिबन क्लब विभागाच्या वतीने फेसपेंटिंग-फेसबुक रीलद्वारे एड्सविषयी जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज




**अंबाजोगाई :** स्वातंत्र्याच्या ७५ व्या अमृत महोत्सवानिमित्त जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग बीड यांच्या वतीने युवकांमध्ये एच.आय.व्हि./ एड्स विषयी जनजागृती निर्माण व्हावी याकरिता विविध उपक्रम राबविले जात आहेत.

आंतरराष्ट्रीय युवा पंधरवाडा निमित्त योगेश्वरी महाविद्यालयात रेड रिबन क्लब, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, बीड व आय.सी. टि. सी., स्व.रा.ती.ग्रा.वै. महा. अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने फेस पेंटिंग व फेसबुक रील अशा नावीन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत चेहऱ्यावर आकर्षक पेंटिंगद्वारे एच.आय. व्हि./एड्स विषयी महाविद्यालयीन युवकांमध्ये जनजागृती निर्माण केली. या उपक्रमांचे आयोजन योगेश्वरी महाविद्यालयातील रेड रिबन क्लब समन्वयक प्रा. डॉ. अनिल नरसिंगे यांनी केले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये एड्स व एचआयव्हीबाबत जनजागृती करण्यासाठी या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्ताने युवकांमध्ये एच. आय. व्हि./एड्स विषयी योग्य असे मार्गदर्शन मिळावे यासाठी जनजागृतीपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यासाठी जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय बीड येथील जिल्हा कार्यक्रमाधिकारी सुहास कुलकर्णी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांनी आपल्या व्याख्यानाद्वारे विद्यार्थ्यांना एच.आय.व्हि./ एड्स विषयी सखोल असे मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना एड्स होण्यामागची प्रमुख कारणे, एड्स या रोगाची लक्षणे, एड्स वर उपलब्ध असलेली उपचार पद्धती व समाजात एड्स आजाराविषयी प्रचलित असलेल्या चुकीच्या गैरसमजुती याविषयी सविस्तर मार्गर्शन केले. तसेच एड्स हा अनेक रोगांचा समूह आहे. एड्स हा रोग असुरक्षित लैंगिक संबंध, दूषित रक्ता द्वारे, दूषित सुया व सिरींज द्वारे, बाधित गर्भवती मातेकडून तिच्या अर्भकाला होतो तसेच प्रतिबंध हाच उपाय आहे. आपण आपल्या आयुष्यात संयमी जीवन जगलात तर आपण एड्स हा रोग टाळू शकतो असे प्रतिपादन सुहास कुलकर्णी यांनी केले.

यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे निराकरण केले. एच.आय.व्ही. समुपदेशक धनराज पवार यांनी एच.आय. व्हि.एड्स तपासणी व ए.आर.टी. उपचारपद्धती याविषयी माहिती सांगितली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डॉ. आर.व्हि.कुलकर्णी होते. त्यांनी अध्यक्षीय समारोप केला. यावेळी आय.क्यू.ए.सी. समन्वयक प्रा.डॉ. यशवंत हंडीबाग, प्रा.डॉ. सारिका संगेकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. ऋतुजा सेलुकर या विद्यार्थिनीने केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रेड रिबन क्लब समन्वयक प्रा. डॉ. अनिल नरसिंगे यांनी केले. आभार प्रदर्शन कु. साक्षी कुलकर्णी या विद्यार्थिनीने मानले. तसेच यावेळी एच.आय.व्ही./ एड्स तपासणी शिबिराचे ही आयोजन करण्यात आले होते. यासाठी स्वा.रा.ती.ग्रा.वै.महा., अंबाजोगाई येथील एच.आय.व्ही. समुपदेशक धनराज पवार, प्रयोगशाळा तंत्रज्ञ विश्वास लवंद यांनी विद्यार्थ्यांची एच.आय व्हि./एड्स तपासणी केली. यावेळी 37 विद्यार्थ्यांनी आपली एच.आय.व्ही./एड्स तपासणी करून घेतली.



# जिल्हा गणेश महासंघ कार्यालयाचे थाटात उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** श्री गणेश महासंघ उत्सव समितीचे कार्यालयाचे थाटात उद्घाटन केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ.भागवत कराड, राज्याचे सहकार मंत्री अतुल सावे, आमदार प्रदीप जैस्वाल, संस्थापक अध्यक्ष पृथ्वीराज पवार यांचे शुभ हस्ते निराळा बाजार चौकत रविवारी संपन्न झाले.

या प्रसंगी बोलताना केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे म्हणाले की, गेली ५४ वर्षे एकाच व्यक्तीच्या मार्गदर्शनाखाली सर्व धर्मीय व सर्वपक्षीय संघटनांचा सहभाग असणारा हा महाराष्ट्रातील एकमेव महासंघ असुन अनेकांचे नेतृत्व याच माध्यमातून झाले ही अतिआनंददायी बाब आहे. केंद्रीय अर्थमंत्री डॉ.भागवत कराड बोलताना म्हणाले की, पंतप्रधान सुरक्षा योजनेत अपघात झाल्यावर दोन लाखांचा विमा देण्यात येतो, या योजनेत जिल्ह्यातील सर्वच गणेश मंडळांच्या अध्यक्ष यांचा विमा काढण्यात येणार असून गणेश महासंघ कार्यालयात कागदांची पुर्तता सर्व गणेश मंडळ अध्यक्षांचा विमा घेण्यासाठी करावी, असेही आवाहन केले. राज्याचे सहकार मंत्री अतुल सावे, रोजगार हमी योजना मंत्री संदीपान भुमरे, विधानसभेचे माजी अध्यक्ष आमदार हरिभाऊ बागडे आदींनी मार्गदर्शन केले.

या प्रसंगी श्री गणेश महासंघ उत्सव समितीचे अध्यक्ष विजय औताडे यांनी प्रास्ताविकात आयोजीत करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमाची माहिती देतांना वृक्षारोपण, योग शिक्षक सत्कार, ई-श्रम कार्ड वाटप, महालक्ष्मी ऑनलाइन सजावट स्पर्धा, कुस्ती स्पर्धा, हभप रामराव महाराज ढोक यांचे जाहीर किर्तन, ढोल वादन स्पर्धा आणि देवदर्शन -देवगड- शनि शिंगणापूर व शिर्डी देवदर्शन सोहळा अशा सर्व कार्यक्रमाची माहीती आपल्या प्रास्ताविकात दिली तर या भव्य उदघाटन सोहळ्याचे प्रास्ताविक विविध संदर्भासह -खुमासदारपणे कार्याध्यक्ष राजेंद्र दाते पाटील यांनी केले तर उपस्थितांचे जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन, मनपा, विविध विभागाचे, पत्रकार बांधवांचे व समस्त पदाधिकारी- कार्यकर्ते आदींचे आभार कोषाध्यक्ष हर्षवर्धन भागवत कराड यांनी व्यक्त केले. या भव्य दिव्य कार्यक्रमात विजयपथ ढोल पथक मयुर पार्क यांनी विविध आकर्षक चाली अक्षय वाघ, सुकल्प सुमित, तिथी मयुरी अश्विनी यांचे मार्गदर्शनाखाली वाजवत कार्यक्रमात रंगत आणली तर मान्यवरांचे स्वागत श्री गणेश महासंघाचे पदाधिकारी अभिषेक देशमुख, प्रा. मनोज पाटील, संदीप शेळके, समीर राजुरकर, अनिकेत पवार, हरिष शिंदे, कचरू घोडके, विशाल दाभाडे, अभिजीत खरात, उल्हास नरवडे पाटील, शिवाजी शिंदे, अजय जैस्वाल, सुरेश टाक, किशोर तुळसीबागवाले, चंद्रकांत जोजारे, विकीराज पाटील, सागर मुगदीया, ऋषीकेश जैस्वाल, उल्हास नरवडे पाटील, शिवाजी शिंदे, सुरेश टाक, राजू पारगावकर, मोहीत त्रिवेदी, विशाल काकडे आदींनी केले. या प्रसंगी पोलीस आयुक्त निखिल गुप्ता, प्रकाश मुगदिया, विलास औताडे, नंदकुमार घोडले, तनसुख झांबड, राजेंद्र जंजाळ, अनिल मकरिये, राजु शिंदे, अभिजीत देशमुख, राजु दानवे, प्रमोद राठोड, जगदीश सिद्ध, बद्रीनारायण भुमरे, सुरज लोळगे, प्रा.चंद्रकांत भराट, महेश माळवदकर, विजय सुबुकडे, अंकीत झांबड, महेश उबाळे, सुरेश वाकडे, संदीप तायडे, धीरज सिद्ध, दिपक परेराव आदीसह अनेक मान्यवर उपस्थित होते. या भव्य कार्यक्रमाचा सांगता समारोप राष्ट्रगीताने संपन्न झाला.

# तैलिक महासभेचे अध्यक्ष जयदत्त क्षीरसागर यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** येथील नगरपंचायत येथे माजी कॅबिनेट मंत्री तथा तैलीक साहू महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष जयदत्त आण्णा क्षीरसागर यांनी सदिच्छा भेट दिली असता फुलंब्री येथील तेली समाजाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात येऊन विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

याप्रसंगी नगराध्यक्ष सुहास शिरसाठ, तैली महासभेचे प्रदेश उपाध्यक्ष तथा भाजपा शहराध्यक्ष योगेश मिसाळ, साई शेलार, सखाराम मिसाळ, उत्तम तावडे, सुरेश मिसाळ, वैभव दुतोंडे, अक्षय पाडळकर, राम बनसोड, रवींद्र काथार, भास्कर वानखेडे, सुमित प्रधान, बाबासाहेब शिंगारे, गजानन नागरे, शेखर पालकर, प्रमोद मिसाळ, काशीनाथ दुतोंडे, संतोष मिसाळ, रामदास आढाव, जगन तावडे, सोमनाथ दुतोंडे, बाळू शेरकर, शरद रोठे, अक्षय आढाव, पंकज लोखंडे, मजहर सय्यद, सागर माटे, मनेश राऊत, संजय आढाव, सतीश मिसाळ, संतोष मिसाळ, कृष्णा दुतोंडे, दिनेश मिसाळ, प्रकाश लोखंडे, रमेश मिसाळ, हरिश्चंद्र वाघ, नवाब पटेल, अमोल मिसाळ, उदय वाढेकर, निलेश सुरासे, अजय पाडळकर, मनोज मिसाळ, सुदाम पवार, गजानन तावडे, सुहास दुतोंडे, आकाश गोरावणे, संतोष सुरभैय्ये आदी उपस्थित होते.

# घोसला येथे पीक संरक्षण सप्ताह

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील दि.29 रोजी मौजे घोसला येथे सरपंच गणेश माळी यांच्या अध्यक्षतेखाली पीक संरक्षण सप्ताहानिमित्त शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. सदर कार्यक्रमात संभाजी पाटील कृ.स. यांनी गुलाबी बोंड अळी नियंत्रणाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

सोबत प्रवीण वाघ कृ.स. यांनी कीटकनाशके फवारणी करताना घ्यावयाची काळजी व कामगंध सापळे याबाबत प्रत्यक्ष शेतावर जाऊन प्रात्यक्षिक घेऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. हेमंत देशमुख कृ.प. यांनी पीक विम्याचा बीड पॅटर्न व ई पीक पाहणी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सोबत आत्मा तालुका तंत्रज्ञान प्रमुख अमोल महाजन यांनी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग याबाबत उपस्थित शेतकऱ्यांना माहिती दिली. पीक संरक्षण मोहीम तालुका कृषी अधिकारी संपत वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण तालुक्यात राबविण्यात येत आहे. एकात्मिक अन्न द्रव्ये व्यवस्थापण आणि कीड रोग व्यवस्था याविषयी शेतकऱ्यांना माहिती दिली. सदर कार्यक्रमाला गावातील प्रगतिशील शेतकरी वर्ग व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

# अधिकारी-पदाधिकाऱ्यात राहिला नाही मेळ; त्यामुळेच झाला ग्रामसभेचा खेळ

## औराळा येथे मुख्य बाजारपेठेतील तोडलेल्या भल्या मोठ्या झाडावरून ग्रामसभेत गोंधळ

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** कन्नड तालुक्यातील औराळा येथे ग्रामविकास अधिकारी, सरपंच, उपसरपंच, सदस्य यांच्यातच आता कुठल्याही मेळ राहिला नसल्याने प्रत्येक जण आपापल्या परिने करत असलेल्या अंदागोदी कारभारामुळे गावात समस्यांचा, तक्रारीचा डोंगर कसा उभा राहिला यांचा अनुभव ग्रामपंचायत कार्यालयासमोर गुरुवारी झालेल्या ग्रामसभेत पाहायला मिळाले. ग्रामसभेत नागरिक अनेक प्रश्नांचा भडीमार करत असताना सरपंच, उपसरपंच, सदस्यांचे फक्त खाली मान घालत हाताची घडी तोंडावर बोट असल्याने व ग्रामविकास अधिकारी यांनीच नागरिकांना उत्तरे दिली. मात्र ग्रामविकास अधिकारी यांच्या कडुन समाधानकारक उत्तर नागरिकांना मिळत नसल्याने ग्रामसभेत चांगला गोंधळ निर्माण झाला. आणि ग्रामसभेचा अक्षरशः खेळ झाला. ड्रेनेज लाईन, नाल्यावरी अनेकांनी टाकलेल्या टपऱ्या, घरकुलाच्या यादी गरजवंताची नावे का डावल्यात आली असे अनेक ज्वलंत प्रश्न नागरिकांनी ग्रामसभेत मांडले. जे लोक निवडून येतील ते त्यांच्या अधिकाराचा वापर करत त्यांच्या जवळील लोकांना नाल्यावरील टपऱ्या टाकण्यासाठी सागंतात. ग्रामपंचायतीने बांधलेले गाळे असताना असताना नाल्यावरती टपऱ्या टाकण्याची गरज काय ? त्यामुळे लाखो रुपये खर्च करून बांधलेले गाळे ओस पडण्याच्या मार्गावर आहे. शिक्षक, तलाठी, ग्रामसेवक, वैद्यकीय अधिकारी, पशुवैद्यकीय अधिकारी हे कोणीच मुख्यालयी राहत नसतांना देखील त्यांना मुख्यालयी राहत असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येते. त्यामुळे ते कर्मचारी ते प्रमाणपत्र सादर करून घरभाडे भत्ता घेतात. यामुळे येथुन पुढे जे गावात राहात असतील अशाच कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहण्याचे प्रमाणपत्र देण्याचा ठराव पारित करण्याचे ग्रामसभेत ठरले.

**कुंपनच शेत खातय**

आठवडी बाजारपेठेतील १०० वर्षापूर्वीचे भले मोठे कडुलिंबाचे झाड तोडण्यात आले. ते झाड कोणाच्या आदेशाने तोडले गेले. ते तोडण्याची परवानगी ग्रामपंचायतीने घेतली होती का? आणि परवानगी घेऊन जर झाड तोडले असेल तर त्यांचे आलेले पैसे आपण ग्रामनिधीत जमा केले असेलच तर मग त्यांची इन्ट्री दाखवा. मात्र ग्रामविकास अधिकारी सुजाता गवई, सरपंच सोनाली बागुल या झाडा बाबत आम्हाला काहीच माहिती नसल्याचे सांगितले. जर ग्रामपंचायतीला हे झाड कोणी तोडले हे माहिती नव्हते तर दुसऱ्या तिसऱ्या दिवशी सदरी झाडाचा पंचनामा करुन अज्ञात व्यक्तीच्या विरोधात गुन्हा का दाखल केला नाही असा प्रश्न नागरिकांनी उपस्थितीत केला. हे झाड तोडण्याची कोणतीही प्रक्रिया पूर्ण करता कानाला कान लावून हे झाड तोडण्यात आल्याचे आरोप करत कुंपण शेत खातय असा आरोप करत ग्रामसभेत गोंधळ उडाला.



**औराळामध्ये लिंबाचं झाड तोडणाऱ्या विरुद्ध महसूल विभाग लक्ष देणार का आणि ग्रामसेवक सरपंच हे झाड तोडणाऱ्या विरुद्ध गुन्हा दाखल करणार का आणि ग्रामसेवक सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य हे म्हणत्या झाड तोड आम्हाला माहित नाही मग ग्रामपंचायतचा कारभार कोण चालवतो असा प्रश्न जनतेला पडला आहे.**

**तात्या जिवरख, औराळा ग्रामस्थ**

**ज्याने कोणी बाजारपेठेतील झाड तोडण्यासाठी सहभागी असल आणि जाने हे का रस्ता केला असेल त्याच्या विरुद्ध कारवाई करून गुन्हा दाखल करणार का आणि ज्याने हे लिंबाचं झाड तोडलं असेल तर महसूल अधिकारी कारवाई करणार का महसूल अधिकारी यांनी चौकशी करून संबंधित लिंबाचे झाड तोडणाऱ्या विरुद्ध कारवाई करा असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने देण्यात आला आहे.**

**प्रशांत पगारे, राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभाग तालुका अध्यक्ष कन्नड**

**सदस्यांना होती माहिती तरी ग्रामसभेत मात्र चुप्पी**

गावातील मुख्य बाजारपेठेतील भले मोठे झाड तोडत असताना काही ठराविक पदधिकाऱ्यांना त्याची माहिती होतीच. ऐवढेच नाही तर झाड तोडत असताना काही सदस्यांनी तेथे फेरफटका देखील मारला. पत्रकार तेथे पोहोचले तेव्हा झाडे तोडणाऱ्या व्यापाऱ्यांनी एका ग्रामपंचायत सदस्याला फोन देखील केला तो सदस्य तेथे आला व त्याला तेथे त्यांच्याच एका सदस्याचा फोन आला. पत्रकार त्यांचे काम करतील आपण आपले काम करु असे झाड तोडत असलेल्या ठिकानावर आलेला सदस्य त्यांच्याच एका सदस्यांशी दुरध्वनीवरुन बोलत होता. आणि ग्रामसभेत याच झाडाचा मुद्दा निघाला तेव्हा हे सदस्य महाशय उपस्थितीत होते. मात्र ऐवढा गोंधळ असताना देखील भ्र शब्द न काढता चुप्पी साधली होती.

**ग्रामस्थांनी ग्रामसभेत मुद्दा उपस्थित केला की बाजारपेठेतील येथील पशुवैद्यकीय दवाखाना आणि अंगणवाडी जवळील लिंबाचे झाड कोणी तोडले हा प्रश्न आम्ही ग्रामसभेत विचारले असतात? ग्रामसभेत ग्रामसेवक सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य यांनी उत्तर दिले की लिंबाचं झाड कोणी तोड आम्हाला माहित नाही मग लाकूड तोडणारा लिंबाचे झाड तोडून घेऊन गेला कसा आणि प्रकरणाकडे महसूल अधिकारी कारवाई करणार का असा सवाल ग्रामस्थांमध्ये उपस्थित होत आहे.**

**सुभाष रिंढे, माजी सरपंच**

**मला ग्रामस्थांचा फोन आला व म्हणाले की डॉक्टर साहेब तुम्ही दवाखान्या जवळील लिंबाचं झाड तोडण्यासाठी ग्रामपंचायतला झाड तोडण्यासंदर्भात अर्ज दिला होता का मी सांगितले की आम्ही कोणत्याही प्रकारे ग्रामपंचायतला झाड तोडण्या संदर्भात कोणताही अर्ज दिलेला नाही.**

**डॉ.कडवे, पशुवैद्यकीय अधिकारी औराळा**

**महसूल अधिकारी या प्रकरणाकडे लक्ष देणार का आणि बाजारपेठेतील लिंबाचे झाड तोडणाऱ्या विरुद्ध ग्रामसेवक सरपंच हे आणि व महसूल अधिकारी गुन्हा दाखल करणार का प्रशासन म्हणते झाडे लावा झाडे जगवा आणि औराळ्यामध्ये होते झाड तोड. ग्रामसेवक सरपंच उपसरपंच हे म्हणते आम्हाला माहित नाही झाड कोणी तोडले मग ग्रामपंचायतचा कारभार कोण चालवतोय.**

**दीपक जिवरख, ग्रामस्थ औराळा**

# परळी-बीड रोडवर सिरसाळ्याजवळ दोन कारमध्ये भिषण अपघात

आधुनिक केसरी न्यूज



**अंबाजोगाई :** परळी-बीड राज्य महामार्गावर सिरसाळ्यापासून काही अंतरावर रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या परिणय मंगल कार्यालयाजवळ इंडिका व ब्रिझा अशा दोन गाड्यांचा समोरासमोर एकमेकांवर चढल्याने सकाळच्या सुमारास मोठा भिषण अपघात झाल्याने समजते. अपघात ईतका भयंकर होता की, दोन्हीही गाड्या समोरासमोर धडकल्या त्यानंतर ब्रिजा गाडीवर इंडिका गाडी चढली.


या अपघातात दोन्हीही गाडीतील प्रवास करणारे प्रवासी गंभीर जखमी झाले असून ऐकाचा जागेवर मृत्यू झाल्याचे कळाले. तर जखमींना अंबाजोगाई येथील स्वा.रा.ती.रुग्णालयात उपचारासाठी पाठवण्यात आले आहे. दोन्ही गाड्या बीडच्या असल्याचे समजते. बीड ते परळी हायवे असो किंवा आंबेजोगाई ते लातूर, वा अंबाजोगाई ते बीड हायवे असो राष्ट्रीय महामार्गावर वाहन चालकांनी आपल्या वाहनाची गती कमी करावी. यासाठी इतरत्र दिसतात तसे.....,

**अती घाई जीवन वाया जाई...!**

**वेगाला आवरा, जीवन सावरा....!!**

**आयुष्य अनमोल आहे....!!!**

यासह ईतर अशा सूचनांचे फलक या तिन्हीही महामार्गावर दिसत नाहीत. राष्ट्रीय महामार्ग विभागाने किमान आता तरी हे फलक लावावेत. आणि वाहनधारकांनीही शिस्त पाळावी अशी जनतेतून मागणी होत आहे.



**पोलिस महिला कर्मचाऱ्यासह मुलगाही ठार**

यातील ऐका गाडीत महिला पोलीस कर्मचारी आणि त्यांचा मुलगा होता. मुलगा जागीच मृत्यू पावला तर स्वा.रा.ती.रु.त उपचारा दरम्यान पोलिस महिला कर्मचारीही मरण पावल्याचे दुर्दैवी वृत्त असून ईतर गंभीर जखमींवरती उपचार चालू असुन पुढील वृत्त हाती येईपर्यंत तुर्तास तर ईतर जखमींबाबतीत ठोस माहिती मिळाली नाही.

या घटनेमुळे केवळ सिरसाळा परिसरच नाही तर बीड जिल्हा पोलिस दल हळहळले असुन अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात ऐरवी ईतरांसाठी पळणाऱ्या अप्पर पोलीस अधीक्षक सौ. कविता नेरकर-पवार या आपल्या महिला पोलिस कर्मचाऱ्याचा जीव वाचवण्यासाठी जातीने लक्ष घालून वैयक्तिक उपस्थित राहून संबंधित डॉक्टरांच्या संपर्कात होत्या. पण यश आले नाही. मुलगा आणि आई गेल्याने संपूर्ण पोलिस दलात शोककळा पसरली आहे.



# अक्षय ऊर्जा क्षेत्रातील सर्वोत्तम कामगिरीसाठी महावितरणला पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** भारत सरकारच्या नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय आणि असोसिएशन ऑफ रिन्यूएबल एनर्जी एजन्सी ऑफ स्टेट्स (एआरईएएस) यांनी अक्षय ऊर्जा क्षेत्रातील सर्वोत्तम कामगिरीसाठी महावितरणचा दोन पुरस्कारांनी गौरव केला आहे.

एआरईएएसच्या ८ व्या वर्धापन दिनानिमित्त केरळमधील कोचीन येथे एएनईआरटी आणि एआरईएएस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात ३१ मार्च २०२२ पर्यंत सर्वोच्च रूफ टॉप सौर ऊर्जा स्थापित क्षमता प्राप्त करणे आणि २०२१-२०२२ मध्ये सर्वाधिक रूफ टॉप सौर ऊर्जा क्षमता जोडण्यासाठी महावितरणला दोन पुरस्कार मिळाले असून केंद्रीय नवीकरणीय ऊर्जा आणि रसायने व खते राज्यमंत्री भगवंत खुबा यांच्या हस्ते महावितरणचे संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे आणि संचालक (वाणिज्य) डॉ.मुरहरी केळे यांनी हे पुरस्कार स्वीकारले. याशिवाय महाराष्ट्राची नोडल एजन्सी असलेल्या महाऊर्जाला ३१ मार्च २०२२ पर्यंत सर्वोच्च बायोमास पॉवर स्थापित क्षमता आणि प्लांट्सची स्थापित संख्या प्राप्त करण्यासाठी दोन पुरस्कारांनी यावेळी गौरविण्यात आले. हा पुरस्कार महाऊर्जाचे अतिरिक्त महासंचालक सूरज वाघमारे यांनी स्वीकारला.

या कार्यक्रमाला केरळचे ऊर्जामंत्री के. कृष्णनकुट्टी, केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाचे सचिव आय.एस. चतुर्वेदी तसेच केरळच्या ऊर्जा विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि एएनईआरटी आणि एआरईएएसचे ज्येष्ठ पदाधिकारी उपस्थित होते. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी रूफ टॉप सोलर बसविण्यामध्ये महाराष्ट्राचा देशात पहिला क्रमांक यावा यासाठी रूफ टॉप घेण्याची प्रक्रिया अधिक सुलभ केली आहे.

रूफ टॉप वापराचे प्रमाण वाढविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली आहे. प्रधान सचिव (ऊर्जा) व महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दिनेश वाघमारे व महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी या पुरस्काराबद्दल अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

# जंगल सत्याग्रहाने स्वातंत्र्याचे अग्निकुंड चेतविले : खा.राकेश सिन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** जंगल सत्याग्रहाच्या माध्यमातून संपूर्ण देशात स्वातंत्र्याचे अग्निकुंड चेतविले. जंगल सत्याग्रहाला भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात यथोचित स्थान देण्याची आवश्यकता आहे, असे विचार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली भारत सरकारद्वारा गठित स्वतंत्रता अमृत महोत्सव समितीचे प्रमुख पदाधिकारी खासदार डॉ. राकेश सिन्हा यांनी व्यक्त केले. लोकनायक बापूजी अणे स्मृती प्रतिष्ठान पुसदच्या वतीने स्वातंत्र्य सेनानी, विदर्भवादी नेते लोकनायक बापूजी अणे यांची १४२ वी जयंती साजरी करण्यात आली. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. राकेश सिन्हा बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रतिष्ठानचे अध्यक्ष वसंतराव पाटील (कान्हेकर) होते. याप्रसंगी बापूजी अणे स्मारक समिती नागपूरचे अविनाश काळे, दीनदयाल अकॅडमीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन परसोडकर, महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे सदस्य ॲड. आशिष देशमुख, सुरेश केतकर उपस्थित होते.



कायदेभंगाची चळवळ सुरू असताना लोकनायक बापूजी यांनी विदर्भातील पुसद नजिकच्या बेलगव्हाण जंगलात १० जुलै १९३० रोजी जंगल सत्याग्रह केला. प्रातिनिधिक स्वरूपात विदर्भातील अनेक जिल्ह्यातील हजारो लोकांनी या सत्याग्रहात सहभाग घेतला. बापूजींनी तुरुंगवास भोगला.

काँग्रेस पक्षातही त्यांची भूमिका मोलाची होती, असे खासदार डॉ. सिन्हा यांनी सांगितले. प्रास्ताविक श्याम जोशी यांनी केले. संचालन श्रुती सरनाईक यांनी तर वैष्णवी बोरगावकर यांनी आभार मानले.

# कन्नड येथे वंधत्व शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरात मेडी आर्ट्स हॉस्पिटल औरंगाबाद व जाधव नर्सिंग होम कन्नड यांच्या संयुक्त विद्यमानाने वंध्यत्व शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा उद्घाटन डॉ. स्वप्ना पवार यांनी केले. याप्रसंगी औरंगाबाद येथील मेडी आर्ट्स हॉस्पिटलच्या डॉ. वैशाली सुरासे यांनी कन्नड शहरातील रुग्णांची जाधव हॉस्पिटल येथे स्त्रियांची तपासणी केली.

मुळ बाळ होण्यात काही अडीअडचणी असल्यास किंवा गर्भपिशीचे काही आजार समस्या असल्यास यावर त्यांनी मार्गदर्शन केले. ग्रामीण भागातील तसेच शहरातील बरेचसे रुग्णावरती त्यांनी तपासणी करून त्यांच्यावर इलाज केला व मार्गदर्शन केले. स्त्रियांमध्ये सध्याला संतती ने होणे पुरुषांमध्ये शुक्रजंतूचे प्रमाण कमी असणे, मानसिक पाळीचे आजार इत्यादी समस्या त्यांना यावेळेस आढळून आल्या. स्त्रियांनी संततीसाठी रेगुलर ट्रीटमेंट घेणे, डॉक्टर सल्ल्यानुसारच काही तपासण्या करून इलाज करणे जरुरीचे असते, असे त्या म्हणल्या.



याप्रसंगी डॉ. एस.जे. जाधव, डॉ. प्रवीण पवार, डॉ. मनोज राठोड, डॉ. आनंद मोतीगे (डॉ.आ.अध्यक्ष), डॉ. रविराज जाधव (रेडिओलॉजिस्ट), डॉ. मिलिंद पाटील, डॉ. स्वप्ना पवार (स्त्रीरोग तज्ञ), डॉ. प्रवीण चव्हाण (स्त्रीरोग तज्ञ), डॉ. भूषण वानखेडे पाटील, डॉ. महेश काचोळे, डॉ. प्रकाश नागणे यांची प्रमुख उपस्थिती होती. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. सदाशिव पाटील, डॉ. विलास पाटील, सचिन गिरी, बापू तळवदे, विकास खाजेकर, दिनेश ठोकळ (सिटी टेक्निशन) त्यांनी परिश्रम घेतले. मेडिकेअर हॉस्पिटलचे सिस्टर सविता झोटे, सिस्टर रेखा केदारे, सिस्टर साक्षी मोहिते, किरण घोगरे पाटील, रवी पवार इत्यादी लोकांनी त्यांना सहकार्य केले.

# अण्णाभाऊंचे साहित्य म्हणजे आदर्श माणूस घडविणारे विद्यापीठ : कृषिमंत्री सत्तार

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** तालक्यातील भवन (माणिकनगर) येथे आज साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री नामदार अब्दुल सत्तार यांची उपस्थिती होती. अण्णाभाऊंनी आपल्या उभ्या आयुष्यात दलित, वंचित आणि उपेक्षित वर्गाच्या सत्य परिस्थितीतील भावना आणि वेदना आपल्या लेखणीतुन मांडून त्यांना उचित न्याय देण्याचा प्रयत्न केला. अण्णाभाऊंची दीड दिवसांची शाळा म्हणजे आज विद्यापीठात पीएचडी च्या माध्यमांतून डॉक्टर घडविणारी फार मोठी आणि महान ताकद आहे व अण्णाभाऊंचे साहित्य म्हणजे आदर्श माणूस घडविणारे विद्यापीठ आहे म्हणून आपण सर्वांनी अण्णाभाऊंचे विचार अंगीकारुन सदैव त्यांची प्रेरणा घेऊन समाजहिताचे काम करायला पाहिजे असे प्रतिपादन कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलताना केले. यावेळी प्रतिभाताई शिंदे यांनी देखील अण्णाभाऊंच्या कार्यावर प्रकाश टाकला.




याप्रसंगी व्यासपीठावर लोकसंघर्ष मोर्चाच्या संस्थापक अध्यक्षा प्रतिभाताई शिंदे, औरंगाबाद मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष तथा कृ.उ.बा.समितीचे सभापती अर्जुन पा.गाढे, सिल्लोड नगरपरिषदेचे गटनेते तथा कृ.उ.बा. समितीचे उपसभापती नंदकिशोर सहारे, संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष राजेंद्र ठोंबरे, कृ.उ.बा. समितीचे संचालक सतीश ताठे, सरपंच भारती कळम, उपसरपंच उज्वला परदेशी, माजी उपसभापती अजीज बागवान, कार्यक्रमाचे आयोजक तथा ज्येष्ठ नेते अशोक कांबळे, ग्रा.पं.सदस्य विजय खाजेकर, सामाजिक कार्यकर्ते संजय कांबळे, मा.लो.प.जिल्हा कार्याध्यक्ष सखाराम आहिरे, मा.लो.प. जिल्हा सरचिटणीस राजु साठे, मा.लो.प.तालुकाध्यक्ष नानासाहेब गायकवाड, मा.लो.प.युवक तालुकाध्यक्ष फकीरचंद तांबे, संपर्कप्रमुख बाबुराव आहिरे, वेणूताई वृद्धाश्रमाचे अध्यक्ष साहेबराव दणके, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य राजु आहिरे, सामाजिक कार्यकर्ते कैलास पाजगे, मातंग एकता आंदोलन जिल्हा सरचिटणीस अशोक शिरसाठ, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा राजश्री साठे, गलवाडा ग्रा. पं.सदस्या सुशिलाताई इंगळे, मंगरूळ ग्रा.पं.सदस्य शिवदास दणके आदींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विजय खाजेकर यांनी केले सूत्रसंचालन मातंग एकता आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष तथा पत्रकार संदीप मानकर यांनी केले तर आभार संजय कांबळे यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयंती उत्सव समितीचे दादाराव साठे, राहुल कांबळे, एस.टी.महामंडळाचे संजय कांबळे, राजु अशोक कांबळे, समाधान लोखंडे, भरत मानकर, गजानन मानकर, सुरेश चंदनशिव, ज्ञानेश्वर निकाळजे, नितीन सौदागर, दिपक सोनवणे आदींसहित जयंती उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी विशेष मेहनत घेतली.



## गणेश मंडळावर असणार पोलीस प्रशासनाची करडी नजर : तात्याराव भालेराव

### तालुक्यातील गणेश मंडळांना दिले सीसीटीव्ही कॅमेरे

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** गणेशोत्सव उत्साहाने सर्वत्र साजरा केला जातो, मात्र बऱ्याचवेळा तरुणाईला उधाण आलेले असते, महिला वर्ग देखील देखावे बघण्यासाठी मोठ्या प्रमाणात बाहेर पडत असता. यावेळी काही अनुचित प्रकार घडू नये यासाठी कन्नड ग्रामीण पोलिसांनी अभिनव उपक्रमाची सुरुवात केली आहे.

तालुक्यातील महत्वाच्या संवेदनशील गणेश मंडळांना कन्नड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या वतीने सीसीटीव्ही कॅमेरे देण्यात आले आहे. ज्यामुळे गणेश मंडळांवर लक्ष ठेवता येईल तसेच त्यामुळे कुठलाही अनुचित प्रकार घडणार नाही. तसेच काही अनुचित प्रकार, घटना घडल्यास सिसिटीव्हीमुळे जे कुणी दोषी असेल त्यांच्यावर अंकुश ठेवणे अथवा त्यांना सहज हेरता येणार आहे. यावेळी साहेबराव अकोलकर माजी सभापती, सरपंच आप्पासाहेब काळे, अध्यक्ष सोनु साबळे, उपाध्यक्ष लक्ष्मण मेगाळ यांची उपस्थिती होती.

**तालुक्यातील गणेश मंडळाला हे सीसीटीव्ही कॅमेरे देण्यात आले आहे. सिसिटीव्ही कॅमेरा योजनेममुळे बऱ्याच अनुचित प्रकारांना आळा बसून महिला वर्गाना आणि वृद्ध तसेच शालेय विद्यार्थी विद्यार्थिनी यांना देखील गणेशोत्सवाचा आनंद घेता येणार आहे.**

**तात्याराव भालेराव**
**सहाय्यक पोलीस निरीक्षक**

## आमदार बंब यांना अर्वाच्य बोलणाऱ्या त्या महिलेवर तत्काळ कारवाई करा : कार्यकर्त्यांचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज



**गंगापूर :** राज्यातील अधिवेशनात गंगापूर तालुक्यातील आमदार प्रशांत बंब यांनी ७० टक्के शिक्षक, कर्मचारी, अधिकारी मुख्यालयी राहत नाही.

त्यामुळे गावातील गरीब कामगार, शेतकरी, शेतमजूर, नागरिक शालेय शिक्षण, आरोग्य, शिक्षण, स्वच्छता पाणी आदि सुविधापासून वंचित राहावे लागते. त्यामुळे भरमसाठ वेतन भत्ता व घरभाडे घेऊनही गावात राहत नसूनही बनावट भाडेपत्या तयार करून गावात राहत असल्याचे भासवून गावातील नागरिकांच्या व शासनाच्या डोळ्यात धूळफेक करतात हे कुठेतरी थांबले पाहिजे म्हणून आमदार प्रशांत बंब यांनी हौस मध्ये लक्षवेधी मांडली यात गैर काय आहे. उलट हे सर्व जनतेचे ज्वलंत प्रश्न आहे त्यासाठी चं आम्ही आमदार निवडून देतोय ना, मग काही शिक्षकांना का झोंबल शिक्षक हा गुरू आहे, मार्गदर्शन करणारा एक जबाबदार घटक आहे म्हणून जनता आदर करते, परंतु एक शिक्षक पत्नीने पातळी सोडून ज्या एकेरी भाषेचा वापर केला. याचा आम्ही निषेध करतो अणि त्या महिलेची सखोल चौकशी करून तात्काळ कारवाई गुन्हा दाखल करावा अन्यथा गावागावात पालक संघटना उभा करून हे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा भारतीय जनता पक्षाच्या वतीने व पंचायत समिती उपसभापती सुमित मुंदडा, शहराध्यक्ष मारुती खैरे, कल्याण गायकवाड, मा पंचायत समिती सदस्य कृष्णा सुकासे, वाघ, प्रशांत मुळे, संदीप आळंसकर, अशोक मंत्री, अतुल रासकर, गणेश पाटील, अमोल पाणकडे, भारत पाटील, अमोल शिंदे, विठ्ठल भटकर, शुभम सातपुते, मोहसीन फिटर, चमन दादा, अजय भालेकर यांच्या नेतृत्वाखाली गंगापूर पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय लोहकरे  यांना दि.29 ऑगस्ट सोमवारी रोजी निवेदन देण्यात आले.

## आमदार घाबरू नका गावकरी, मतदार तुमच्या पाठीशी आहे

आधुनिक केसरी न्यूज



**गल्ले बोरगाव :** खुलताबाद/ गंगापूरचे आमदार तसेच मतदाराचे, गावकऱ्यांचे एकमेव प्रश्न आणि अडचणी सोडविण्यासाठी अतोनात प्रयत्न करणारे प्रशांत बंब यांनी मतदाराचे, गावकऱ्यांचे अडचणी व प्रश्न म्हणजेच शैक्षणिक, कृषी, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जि.प. मध्ये गावकऱ्यांचे येरझऱ्या मारून न सुटणारे प्रश्न विधान परिषदेत मांडले. त्यामुळे शिक्षण क्षेत्रातील कामचुकार व बेजबाबदारपणे काम करणाऱ्या शिक्षक, शिक्षक पत्नीने विधानपरिषदेत आवाज उठवणारे खरे आमदार प्रशांत बंब यांना भ्रमणध्वनीवरून अपशब्द वापरून त्यांचा अवमान केला. म्हणून गावकरी, जेष्ठ मतदार वसंता शिरसाट यांनी खुलताबाद पोलिस ठाण्यात शिक्षक आणि शिक्षक पत्नीवर गुन्हा दाखल करण्याचे निवेदन देऊन मागणी केली आहे.

याबाबत विशेष बाब अशी की, गावकरी आणि मतदाराचे होणारी हेळसांड थांबवण्यासाठी खुलताबाद व गंगापूरचे आमदार प्रशांत बंब यांनी शिक्षण विभागातील कर्मचारी कामचुकार व बेजबाबदारपणे काम करतात. याबाबतचा योग्य महत्त्वाचा मुद्दा विधान परिषद मांडला. सदर मुद्दा हा पुराव्यासह मांडला असतानाही काम चुकारपणा व बेजबाबदार शिक्षण विभागातील शिक्षक, शिक्षकाची पत्नीचा जळफळाट झाला. त्यांना सत्य पचवता आले नाही म्हणून त्यांना ढाळ उलट्या लागल्या म्हणून काहीही बोलायला लागले अशा महिला शिक्षक पत्नीला डॉक्टर व पोलीस शासनाची गरज आहे. तरी महोदयांनी सदर शिक्षक व पत्नीवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी आजिनाथ बारगळ, वसंत मेंगाळ, सुधाकर जेठे, श्याम कोतकर, सुखराम मेंगाळ, दगडू सिंग मुऱ्हाडे, शंकर अंभोरे, अरुण गायकवाड, सुनील मुसळे आदींनी निवेदनावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.



## जैन समाजाच्या वतीने लोणार शहरात काढण्यात आली शोभायात्रा

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** जैन समाजबांधवांच्या वतीने आज 28 ऑगस्ट रोजी शहरातून शोभायात्रा काढण्यात आली. दुपारी एक वाजता या शोभायात्रेला सुरुवात झाली. अबाल वद्धासह महिला, पुरुष मोठ्या संख्येने या शोभायात्रेत सहभागी झाले होते. बुधवार 24 ऑगस्टपासून आठ दिवसीय पर्युषण पर्व सुरू झाले आहे.

या आठ दिवसात जैन समाज बांधवांचे सकाळी सहा वाजेपासून धार्मिक कार्य सुरू होतात. नऊ वाजता प्रवचन दुपारी पूजा, कल्पसूत्र वाचन तथा संध्याकाळी सात वाजता प्रतिक्रमण तसेच भक्ती संध्या व लहान मुलांचे धार्मिक कार्यक्रम अशा प्रकारे संपूर्ण आठ दिवसाची दिनचर्या आहे. यावर्षी स्वाध्यायी म्हणून चिन्नई येथून दिनेश भाई, सम्यकभाई तरुणभाई आलेले आहेत. रविवारी कल्पसूत्र वाचन दरम्यान पाचव्या दिवशी भगवान महावीरांच्या जन्माकल्याणकाचे वाचन करण्यात येते. त्यामुळे आज शहरात जन्मोत्सव साजरा करण्यात आला. दुपारी एक वाजता जैन मंदिरापासून रथात भगवान महावीर यांची प्रतिमा ठेवून शोभायात्रा काढण्यात आली. प्रताप चौक, सराफ लाईन या मार्गे फिरून आनंद मंगल भवन येथे शोभायात्रा विसर्जन करण्यात येउन लोणार येथे चातुर्मासानिमित्त उपस्थित प.पू अनुप्रेक्षाजी म.सा. आदी ठाणा 3नी भगवान महावीरांच्या जीवनावर प्रकाश टाकला. सोबतच पर्युषण पर्वाचे महत्त्व सांगितले. या शोभायात्रेची धुरा मुनीसुव् त संगीत मंडळाने सांभाळली.

## स्वातंत्र्याच्या पंचाहत्तरीनंतर चारबन शाळेत आली कायम लाईन; शिक्षकांच्या प्रयत्नांना यश

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा. :** दुर्गम, डोंगराळ भागातील जि.प.शाळा चारबन येथे स्वातंत्र्याच्या पंचाहत्तर वर्षानंतर कायम स्वरूपी गावठाण फिडरची विद्युत आली. त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला असून डिजिटल शिक्षणाची सोय उपलब्ध झाली आहे.

जळगाव जा. तालुक्यातील डोंगराळ, आदिवासी भागातील चारबन शाळेत ॲग्रीकल्चरचा विद्युत पुरवठा होता. त्यामुळे आठवड्यातून फक्त 3 दिवस व त्यातही फक्त 2 ते 3 तास शाळेत लाईट राहत होती. त्यातही गेल्या वर्षभरापासून शाळेत विद्युत पुरवठा नसल्याने आदिवासी विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षण देण्याचे शिक्षकांचे स्वप्न भंग झाले होते. शिक्षकांनी लोकवर्गणीतून शाळेसाठी कॉम्प्युटर, 3 टीव्ही, इन्व्हर्टर, पंखे, प्रोजेक्टर मिळविले होते, परंतु शाळेत विद्युत पुरवठा नव्हता. त्यामुळे शिक्षक दिपक उमाळे यांनी पुढाकार घेऊन मुख्याध्यापक गोवर्धन दांडगे, ममता गावित यांच्या सहकार्याने इच्छा तेथे मार्ग या म्हणीप्रमाणे लोकवर्गणीतून शाळेसाठी कायमस्वरूपी गावठाण फिडरची लाइन मिळविली. त्यासाठी ठेकेदार निलेश पाटील यांनी शाळेसाठी 5 विद्युत खांब व सर्व तांत्रिक बाबी विनामूल्य दिल्या. ग्रा.प.उमापूरने केबल व मजुरी दिली. चारबन चे मुखीया उदयसिंग पटेल यांनी त्यांच्या शेतातील उभ्या पिकातून शाळेसाठी विद्युत खांब उभे करण्याची



परवानगी दिली. सयाराम कनाशा यांनी जी.आय. तार व इन्सुलेटर दिले. चारबन गावकऱ्यांनी श्रमदानातून लाईन ओढून दिली. अशाप्रकारे शिक्षकांनी पुढाकार घेऊन लोकसहभागातून शाळेसाठी कायम स्वरूपी विद्युत उपलब्ध करून घेतली. शनिवार व रविवार सुटी असून सुद्धा शाळेत लाईन येणार म्हणून शिक्षकांसह विद्यार्थी शाळेत हजर होते. शाळेतील टीव्ही सुरू झाल्याने आदिवासी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर अलौकिक हास्य फुलले होते. आदिवासी दुर्गम भागातील शाळेसाठी डिजिटल शिक्षणाची सोय उपलब्ध झाल्याने विद्युत वितरण कंपनी, पंचायत समिती जळगाव, ग्रामपंचायत उमापूर व चारबन गावकऱ्यांचे शाळा प्रशासनाच्या वतीने उपक्रमशील शिक्षक दिपक उमाळे यांनी आभार मानले.

# आधार माणुसकीच्या माध्यमातून कोरोना काळातील विधवा महिलांनी केली अंबाजोगाई बसस्थानकाची स्वच्छता

आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल सिरसाट**

**अंबाजोगाई :** जागतिक पातळीवर आलेल्या कोरोनाच्या महामारीत करोडो कुटुंब उद्ध्वस्त झाले. त्याच धरतीवर उद्भवलेल्या अंबाजोगाई तालुक्यातील अनेक कुटुंबे रस्त्यावर आली. तर अनेक माता माऊलींच्या कुटुंबकर्त्यांचा कोरोनाने मृत्यू झाल्यामुळे अनेक कुटुंबे उघड्यावर आली. परंतु त्या काळात अनेकांनी केलेल्या मदतीची, विशेष करून आधार माणूसकीच्या माध्यमातून झालेल्या मदतीची जाणीव लक्षात घेऊन रविवारी कोवीडसह शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील अनेक महिलांनी प्रत्यक्ष हातात खराटा घेऊन अंबाजोगाई येथील बसस्थानक स्वच्छ केले. या उपक्रमात ग्रामीण भागातील २५ महिला सहभागी झाल्या होत्या.

**पतीच्या मृत्यूनंतर स्व आणि आधार माणूसकीच्या बळावर जगतायेत उर्वरित आयुष्य**

पती-जोडीदार गेल्यानंतर जीवनात एक संकट नसते. परंतु आधार माणूसकीच्या माध्यमातून मिळणाऱ्या वेळोवेळीच्या सहकार्याने पतीचे छत्र हरवल्यानंतर जिद्दीने अनेक संकटाना सामोरे जात, आपल्या संसाराचा गाडा हाकणाऱ्या महिलांनी आम्हीही विधायक उपक्रम राबवू शकतो हा संदेशच जणूकाही या बसस्थानक परिसरातील स्वच्छतेच्या माध्यमातून या माता-माऊल्यांनी दिला आहे, नव्हे ऐक आदर्शच या महिलांच्या स्वच्छता उपक्रमातून समाजासमोर ठेवला आहे. येथील आधार माणुसकीच्या उपक्रमाचे प्रमुख ॲड. संतोष पवार यांनी मांडलेल्या संकल्पनेला प्रतिसाद देत सामाजिक उत्तरदायित्वाचा हा उपक्रम या महिलांनी मोठ्या मनाने राबविला.



**मदत घेण्यासाठी आल्या आणि मदत देऊन गेल्या**

रविवारी या महिला एका कार्यक्रमात ब्लॅकेटची मदत स्वीकारण्यासाठी आल्या होत्या. हा कार्यक्रम झाल्यानंतर गावाकडे जाण्यापूर्वी हा स्वच्छतेचा उपक्रम राबविण्याची संकल्पना ॲड. पवार यांनी त्यांच्यासमोर मांडली. त्यांनी या सामाजिक कार्यास होकार दिला. महिलांची समंती मिळाली, पण स्वच्छता करण्यासाठी झाडू नव्हते, ते शेजारी, पाजरी मागून आणले, कचरा गोळा करण्यासाठी पोतेही जमा केले. त्यानंतर या महिलांनी दुपारी प्रत्यक्ष स्वच्छतेला सुरूवात केली.

या महिला घरातील व परिसराची झाडजूड रोज करतात, परंतू सार्वजनिक बसस्थानकाची स्वच्छता करण्याची त्यांची ही पहिलीच वेळ होती. या कामात प्रचंड धुळ उडणार असल्याने, महिलांनी आतून मास्क व त्यावर चेहऱ्यावर रुमाल बांधून तासाभरात सर्व बसस्थानक चकाचक केले. जमा झालेला कचराही जागेवर न ठेवता, तो गोळा करून त्याची व्हिल्लेवाटही लावली. विधवा असणे ही हतबलता नसून मदत घेण्यासाठी आल्या खऱ्या, पण केवळ घेऊन न जाता देऊनही गेल्याची चर्चा तालुक्यातील गांवागांवात होते आहे. हे म्हणजे आसे झाले.

**ऐका हाताने द्या, एका हाताने घ्या....!**

या उपक्रमात अंबाजोगाईसह तालुक्यातील राडी, पूस, साकुड, वरवटी, सुगाव, धानोरा (बु) कुंबेफळ, सोनवळा, पोखरी, तळेगावघाट, लिंबगाव तांडा, सेलूअंबा या गावातील महिला सहभागी झाल्या होत्या. यावेळी स्थानकप्रमुख अमर राऊत, गणेश लाड, संतोष माकेगावकर व बस प्रवासी यांनी आधार माणुसकीच्या उपक्रमाचे प्रमुख ॲड. पवार, सामाजीक कार्यकर्ते भगवंत पाळवदे यांच्यासह महिलांचे स्वागत केले. तर सातत्याने या ना त्या मार्गाने समाजातील पिडीत-वंचितांसाठी अहोरात्र खंबीरपणे उभे राहणाऱ्या ॲड.संतोषराव पवार यांचेही नेहमीप्रमाणे सर्वत्र कौतुक होताना दिसून येते आहे.

# पावसाने दडी मारल्याने पिके करपू लागली; उत्पादनात निम्म्याने घट होण्याची शक्यता

## आ. मुंदडा, आ. पवारांची जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा; पंचनामे करण्याची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** बीड जिल्ह्यात सुरवातीला चांगला पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी सोयाबीन, मुग, उडीद, कापूस, पिके मोठ्या प्रमाणात घेतली व पिकेही जोमात आली होती. परंतु मागील जवळपास (१) ऐक महिन्यापासून पावसाचा खंड पडला असल्यामुळे सोयाबीन, मुग, उडीद, कापूस, या पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. पिके करपू लागले आहेत. त्यामुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तातडीने पाहणी करून पंचनामे करावेत अशी मागणी केज विधानसभा मतदार संघाच्या आ.नमिता मुंदडा यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. दरम्यान आ. मुंदडा आणि आ.लक्ष्मण पवार यांनी सोमवारी (दि.२९) जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा यांची संयुक्तरित्या भेट घेऊन शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपोटी २५ % टक्के पीकविमा अग्रिम रक्कम देण्याची मागणी केली.

शेंगा भरण्याच्या काळात सोयाबीन, मुग, उडीद, ही पिके पाण्याच्या ताणाला अतिशय संवेदनशील आहेत. नेमकी ही पिके फुल धरण्याच्या अवस्थेत असताना बीड जिल्ह्यात मागील २० ते २५ दिवसापासून पावसाचा एकदमच खंड पडला आहे. यामुळे पाण्याचा ताण बसल्याने फुल गळती मोठ्या प्रमाणात झाली असून शेंगा कमी प्रमाणात भरल्या आहेत. ज्या शेंगा भरल्या आहेत त्यामध्ये दाण्याचा आकार कमी झाला असून दाणे कमी पोसले आहेत. यामुळे उत्पन्नात कमालीची घट होणार असून हंगामामध्ये प्रतिकूल परिस्थिती मध्ये शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. या आधीच शंखी गोगलगाय व पिवळा मोझाक यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले होते. त्यात आता पावसाने दडी दिल्याने शेतकऱ्यांच्या नुकसानात भर घातली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी वरील



सर्व बाबींचा विचार करून तातडीने पाहणी करून पंचनामे करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. बीड जिल्ह्यातील सोयाबीन, मुग, उडीद, कापूस, पिकांचे तातडीने पंचनामे करण्याबाबत आदेश देऊन विमा कंपनीला गांभीर्याने घेण्याबाबत आदेश अशी मागणी आ. नमिता मुंदडा यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा; २५ टक्के अग्रिम रक्कम देण्याची मागणी : शेतकऱ्यांना पाऊस व विम्याची आस-आवश्यकता**

दरम्यान सोमवारी आ.मुंदडा आणि आ.पवार यांनी सदरील प्रश्नावर जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा यांची भेट घेऊन चर्चा केली. या बैठकीत जिल्हा कृषी अधीक्षक जेजुरकर आणि बजाज अलायन्स पीकविमा कंपनीचे जिल्हा प्रतिनिधी उपस्थित होते. खरीप हंगामातील उत्पन्नात ५० टक्के अधिक घट अपेक्षित असल्यास त्यावेळी २५ टक्के अग्रिम रक्कम देण्याची पिकविम्यात तरतूद आहे. त्यानुसार बीड जिल्ह्यातील मुग सोयाबीन, उडीद, कापूस या पिकास नुकसान भरपाई देण्यासाठी अधिसुचना निर्गमित करावी अशी मागणी दोन्ही आमदारांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली.

दरम्यान, यलो मोझायकमुळे झालेल्या नुकसानीचा अहवाल तयार असून गोगलगाय मुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे सुरु असून लवकरच अहवाल शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती कृषी अधीक्षक जेजुरकर यांनी दिली. या बैठकीस ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, भाजपा केज तालुकाध्यक्ष भगवान केदार, शेख रहीम, दिलीप सांगळे, नूर पटेल, खलील मौलाना, ताहेरभाई, शरद इंगळे आदी उपस्थित होते....!



# अक्षर मानव संविधान व संविधान प्रचारक लोकचळवळ आयोजित संविधान प्रचार, प्रसार कार्यशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**बदलापूर :** भारतीय संविधानातील मूल्यांचा प्रचार व प्रसार व्हावा, जनजागृती व्हावी, प्रत्येक भारतीय संविधान साक्षर व्हावा या उद्देशाने अक्षर मानव आणि संविधान प्रचारक लोक चळवळ यांच्या वतीने रविवार दि. 28 ऑगस्ट 2022 रोजी संविधान प्रचारक एकदिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. ही कार्यशाळा बदलापूर येथील बाळासाहेब म्हात्रे महाविद्यालय येथे संपन्न झाली.

या कार्यशाळेच्या सुरुवातीला अक्षर मानव संविधान विभाग प्रमुख माधुरी शिंदे यांनी सर्वांचे स्वागत केले. कार्यशाळा वक्ते आणि संविधान प्रचारक नागेश जाधव, अज़रुद्दिन पटेल आणि स्वाती पाटील यांचे स्वागत करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. अक्षर मानव शिक्षण विभाग प्रमुख नीलिमा पगारे यांनी अक्षर मानव भूमिका स्पष्ट केली. या कार्यक्रमाला ज्येष्ठ संविधान प्रेमी दैवशला गिरी यांची उपस्थिती होती.

सकाळी चालू झालेल्या या कार्यशाळेत संविधान प्रचारक नागेश जाधव यांनी खेळ, उदाहरणं आणि हसत खेळत सहज सोप्या भाषेत संविधानाचा अर्थ, त्यांची मूल्ये आणि भारतीय म्हणून आपली असलेली जबाबदारी यांची मांडणी आणि जाणीव अगदी योग्य पद्धतीने करून दिली. विशेष म्हणजे या कार्यशाळेला लहान मुलांपासून अगदी तरुण आणि वयोवृद्धांनी ही हजेरी लावलेली होती. संविधानातील सार्वभौम, समाजवाद, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य या तत्वांची प्रत्येकाच्या बुद्धीला पटेल अशी व्याख्या समजावून सांगून, या तत्वांना सामान्य जीवनात किती मोल आहे हे पटवून देण्यात आले.

या कार्यशाळेला मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ साहित्यिक आणि अक्षर मानव संस्थापाक राजन खान यांची उपस्थिती सगळ्यांना ऊर्जा देऊन गेली. समारोपीय भाषणात संविधान आणि आपण याविषयावर मार्गदर्शन केले आणि अशा कार्यशाळेचे अक्षर मानवकडून आयोजन प्रत्येक जिल्ह्यात करण्यात येईल, असे घोषित केले. यानंतर अक्षर मानव राज्य उपाध्यक्ष दीपेश मोहिते यांनी उपस्थित सर्वांचे, तसेच वक्त्यांचे, आयोजकांचे आभार माणून कार्यशाळेचा समारोप केला.

या कार्यशाळेला अक्षर मानव कविता विभाग रत्नागिरी जिल्हा प्रमुख चंद्रसेन जाधव, अनंत नागपुरे, संजीव साळी, सलीम तहसीलदार, बदलापूर अध्यक्ष वैदेही वखारे, पर्यटन विभाग प्रमुख शशी घुमरे, प्रेम दादा, अपूर्व पगारे यांचे सहकार्य आणि खास उपस्थिती लाभली.

# एचआयव्ही एड्स तपासणी प्रत्येकांनी करून घ्यावी : डॉ. परदेशी



आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. शरदसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त विनायकराव पाटील महाविद्यालय कन्नड येथे रेड रेड रिबीन क्लब ची स्थापना करण्यात आली व एचआयव्ही एड्स जनजागृती करण्याच्या उद्देशाने पोस्टर प्रदर्शनी करण्यात आले.

संजय सोनवणे यांनी एचआयव्ही एड्सविषयी मार्गदर्शन केले. शशिकांत गांगुर्डे प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांनी एकूण 30 विद्यार्थ्यांची एचआयव्ही रक्त तपासणी केली. विशाल उंडे यांनी आरकेएसके कार्यक्रमाविषयी सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी कोरोना काळात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल ग्रामीण रुग्णालयाचे सर्व टीमचा शाल, श्रीफळ देऊन कोरोना योद्धा म्हणून महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. एचआयव्ही एड्सला देशातून हद्दपार करण्याचा रुग्णांसोबत माणुसकीची वागणूक देण्याचा संकल्प म्हणून मानव साखळीची निर्मिती करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक मोरे यांनी केले. प्रस्तावना प्राध्यापक सुधीर पवार यांनी केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य शरद गावंडे, उप प्राचार्य सरला गोरे उपस्थित होत्या. याचबरोबर महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांना कोरोनाची लस देण्यात आली.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in